cmyk

## संपादकीय

### भाजपाच्या खेळी फसत चालल्यात!

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका जिंकण्यासाठी 'दोनशे पार' द्वारे सत्तेचे ध्येय साध्य करण्यासाठी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी संभ्रम दूर करून जशास तसे उत्तर देण्याचे आदेश केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी रविवारी झालेल्या भाजपच्या महाराष्ट्र अधिवेशनात दिले. महाविकास आघाडी म्हणजे औरंगजेब फॅन क्लब असून उद्धव ठाकरे हे त्याचे अध्यक्ष आहेत, शरद पवार म्हणजे भ्रष्टाचाऱ्यांचे म्होरके आहेत, पराभूत होऊनही राहुल गांधी फुग्यासारखे फुगले आहेत अशी जोराची टीका शहा यांनी करून विधानसभा निवडणुकीचा नारळ फोडला.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### सरकार टिकवण्यासाठी बिहार आंध्र प्रदेशला मुक्त हस्ते निधी–नाना पटोले

मुंबईः केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारमन यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात फक्त मोठमोठे आकडे व आकर्षक घोषणा आहेत, कोणतेही धोरण आणि व्हिजन नाही. गेल्या १० वर्षापासून मोदी सरकारच्या अर्थसंकल्पात जनतेच्या हितापेक्षा हेडलाईन मॅनेजमेंटचीच काळजी घेतलेली दिसते. देशात बेरोजगारीची मोठी समस्या असताना तरुणांना पक्क्या नोकऱ्या देण्यासाठी सरकारकडे कोणतेही ठोस धोरण नाही. शेतकऱ्यांना दिलासा देणारी एकही योजना अर्थसंकल्पात दिसत नाही. महागाईने त्रस्त जनतेला दिलासा देण्यासंदर्भात तरतूद नाही, एनडीए सरकारच्या अर्थसंकल्पाने सर्व घटकांची घोर निराशा केली असून शेतकरी, महिला, तरुण, विद्यार्थी, लघु, छोटे व मध्यम उद्योगासह सर्वसामान्यांची निराशा केली आहे.

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–९३ बुधवार दि.२४ जुलै २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

# उशीरा का होईना केंद्राचे शेतकऱ्यांकडे लक्ष; गेमचेंजर योजना जाहीर

## मोदी ३.० सरकारचा अर्थसंकल्प : कृषी क्षेत्रासाठी १.५२ लाख कोटींची तरतुद

नवी दिल्ली । वृतसंस्था

मोदी ३.० सरकारचा अर्थसंकल्प मंगळवारी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत सादर केला. यात कृषी क्षेत्रासाठी तब्बल १.५२ लाख कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तसेच नैसर्गिक शेतीसाठी केंद्र सरकारने महत्वाचे पाऊल उचलले असून याचा शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. गेल्या १० वर्षात मोदी सरकारने शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली असून यावेळी मात्र काही तरी देण्याचा प्रयत्न केला आहे. उशिरा का होईना



शेतकऱ्यांकडे केंद्र सरकारचे यावेळी लक्ष गेल्याचे दिसते आहे.

निर्मला सीतारामन कृषी क्षेत्राशी निगडीत घोषणा करताना म्हणाल्या की, कृषी व संलग्न क्षेत्रांसाठी १.५२ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून कृषीची विकासासाठी याचा मोठा फायदा होणार आहे. नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक ती पावलं सरकारकडून उचलली जाणार आहेत. आगामी वर्षात नैसर्गिक शेतीवर भर देण्याचा सरकारकडून घेण्यात आला आहे. पुढील काही वर्षात एक कोटी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेती करण्यास प्रोत्साहन दिले जाणार आहे, असे त्यांनी म्हटले.

गेल्या दोन दशकात आमचे सरकार नैसर्गिक शेतीवर जोर देत आहे. सध्या बाजारात सेंद्रीय उत्पादनाला चांगला भाव मिळतोय. जागतिक बाजारात सेंद्रीय गहू, तांदूळ यांच्यासह अनेक गोष्टींना ◀◀ पान २ वर

### शेतकऱ्यांना मिळणार किसान क्रेडीट कार्ड

दरम्यान, अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी शेतकऱ्यांना किसान क्रेडीट कार्ड देण्याचीही घोषणा केली आहे. केंद्र सरकारद्वारे पाच राज्यात जन समर्थ आधारीत किसान क्रेडीट कार्ड जारी केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

### कृषी क्षेत्रासाठी महत्वाच्या घोषणा

- ❊ नैसर्गिक शेतीला प्राधान्य देणार
- ❊ कृषी उत्पादन वाढवण्यावर सरकारचा भर
- ❊ डाळ आणि तेलबियांच्या उत्पादनात स्वयंपूर्ण होण्यावर भर
- ❊ शेतकऱ्यांसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म उभारणार, सहा कोटी शेतकऱ्यांचा रेकॉर्ड डिजिटल होणार
- ❊ शेती क्षेत्रातील उत्पादकता वाढवण्यासाठी डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर पुरवले जाईल. त्यातून शेतीपिकांचं सर्वेक्षण, मातीची तपासणी अशा सर्व गोष्टींची माहिती शेतकऱ्यांना दिली जाईल.
- ❊ या वर्षी शेती व संलग्न क्षेत्रांसाठी १.५२ लाख कोटींची तरतूद करण्यात आली आहे
- ❊ सोयाबीन आणि सुर्यफुल बियांची साठवण वाढवणार
- ❊ ३२ फळ आणि भाज्यांच्या १०९ जाती वितरीत करणार



### अर्थसंकल्पातील १० मोठ्या घोषणा

- ❊ नव्या कररचनेत बदल, ३ लाखांपर्यंतच्या उत्पन्नावर कोणताही कर नाही
- ❊ १ कोटी तरुणांना ५०० टॉप कंपन्यांमध्ये १२ महिन्यांची इंटर्नशीप, महिन्याला ५ हजार रुपये भत्ता
- ❊ २५ हजार तरुणांना ७.५ लाख रुपयापर्यंत कौशल्य विकास शिक्षणासाठी कर्ज
- ❊ देशांतर्गत संस्थांमध्ये उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना १० लाख रुपयांचं कर्ज
- ❊ पहिल्यांदा पीएफ खाते सुरू करणाऱ्या नोकरदाराला १५ हजार रुपये तीन हप्त्यांत देणार
- ❊ कृषी क्षेत्रासाठी १ लाख ५२ कोटी रुपयांची तरतूद
- ❊ ग्रामविकासासाठी २ लाख ६६ हजार कोटींची तरतूद, राज्यांना १५ वर्षे व्याजमुक्त कर्जपुरवठा
- ❊ महिला आणि बालकांसाठी असणाऱ्या योजनांसाठी ३ लाख कोटींची तरतूद
- ❊ रोजगार, कौशल्य विकास, एमएसएमईसाठी ५ योजना, २ लाख कोटी खर्च
- ❊ मोबाईल फोन, चार्जर, चांदी, सोनं, सोलर सेट, इलेक्ट्रिक वाहनं, कॅन्सरची औषधं स्वस्त

## रेल्वेत तीन नवीन आर्थिक कॉरिडॉर

### ४० हजार सामान्य बोगी वंदे भारत दर्जाच्या होणार

#### रेल्वेचे बजेट वाढले

*५ वर्षांपूर्वी म्हणजेच २०१९ च्या अर्थसंकल्पात रेल्वेला ६९,९६७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यानंतर २०२० मध्ये रेल्वेला ७०,२५० कोटी रुपये देण्यात आले. एका वर्षानंतर, म्हणजे २०२१ मध्ये, पहिल्यांदाच रेल्वेचा अर्थसंकल्प १ लाख कोटी रुपयांच्या पुढे गेला. तर २०२३ मध्ये म्हणजे गेल्या वर्षी रेल्वेच्या अर्थसंकल्पीय वाटपाने प्रथमच २ लाख कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला होता.*

#### २०१७ पासून सामान्य अर्थसंकल्पाचा भाग

*मोदी सरकारच्या आधी रेल्वेसाठी वेगळा अर्थसंकल्प सादर करण्यात आला होता. ही परंपरा २०१७ पासून बदलली. रेल्वे अर्थसंकल्प हा तत्कालीन अर्थमंत्री अरुण जेटली यांनी त्या वर्षी सादर केलेल्या सर्वसाधारण अर्थसंकल्पाचा एक भाग होता. त्याआधी रेल्वे अर्थसंकल्प रेल्वेमंत्र्यांनी स्वतंत्रपणे मांडला होता. आता गेल्या ७ वर्षांपासून रेल्वे अर्थसंकल्प सामान्य अर्थसंकल्पाचा भाग म्हणून येत आहे.*

मुंबई:मोदी सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळातील शेवटच्या अर्थसंकल्पात रेल्वेला मोठी घोषणा करण्यात आली आहे. आज (१ फेब्रुवारी) गुरुवारी लोकसभेत अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी ३ नवीन रेल्वे इकॉनॉमिक ◀◀ पान २ वर

## बजेटमधून महाराष्ट्राला काय मिळाले

### देवेंद्र फडणवीसांनी आकडेवारीसह सांगितले



मुंबई । महायुतीमधील प्रमुख पक्षाच्या सर्वच नेत्यांनी बजेटवर प्रतिक्रिया देताना महाराष्ट्राच्या विकासांचे आणि देशाच्या गतीमानशीलतेचे हे बजेट असल्याचे म्हटले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र ◀◀ पान २ वर

#### भाजपने ट्विट करुन दिली माहिती

ज्यांना अर्थसंकल्पातील काहीच कळत नाही अशा उबाठांसाठी हा सोप्या भाषेतला अर्थसंकल्प, बजेटमधील महाराष्ट्राच्या वाट्याला आलेल्या घोषणांची यादी, असे ट्विट भाजपने केले आहे.

#### सुजलाम सुफलाम महाराष्ट्रासाठी

विदर्भ मराठवाड्यातील सिंचन प्रकल्प: ६०० कोटी, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते सुधार: ४०० कोटी, सर्वसमावेशक विकासासाठी इकॉनॉमिक कॉरिडॉर: ४६६ कोटी, पर्यावरणपूरक शाश्वत कृषि प्रकल्प: ५९८ कोटी, महाराष्ट्र कृषी आणि ग्रामीण परिवर्तन प्रकल्प: १५० कोटी, ३ : ९०८ कोटी, मुंबई मेट्रो: १०८७ कोटी, दिल्ली–मुंबई औद्योगिक कॉरिडॉर: ४९९ कोटी, ग्रीन अर्बन मोबिलिटी: १५० कोटी, नागपूर मेट्रो: ६८३ कोटी, नाग नदी पुनरुज्जीवन: ५०० कोटी, पुणे मेट्रो: ८१४ कोटी, मुळा मुठा नदी संवर्धन: ६९० कोटी

## कृषी विकासाला प्राधान्य देणारा अर्थसंकल्प–धनंजय मुंडे

मुंबई । प्रतिनिधी

**केंद्रातील प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील भारत सरकारने पाहिलेल्या विकसित भारताचे स्वप्न साकार करण्याच्या दृष्टीने टाकलेले सकारात्मक पाऊल हा आजचा अर्थसंकल्प आहे. विकसित भारताची पायाभरणी करण्यासाठी कृषी क्षेत्राच्या विकासाला प्राथमिक प्राधान्य देण्यासह आवश्यक असणाऱ्या महत्त्वपूर्ण तरतुदी या अर्थसंकल्पात करण्यात आल्या आहेत अशी प्रतिक्रिया महाराष्ट्राचे कृषिमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते धनंजय मुंडे यांनी आजच्या केंद्रीय अर्थसंकल्पावर व्यक्त केली आहे.**



केंद्रीय अर्थसंकल्पात ज्या प्रमुख चार घटकांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे त्यामध्ये शेतकरी, गरीब, महिला आणि युवा यांचा प्रामुख्याने समावेश आहे. कृषी क्षेत्रासाठी एक लाख ५२ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून १ फेब्रुवारी, २०२४ रोजी अंतरिम अर्थसंकल्प सादर करण्यात आला, त्यामध्ये १ लाख २७ हजार कोटींची तरतूद करण्यात आली होती. २७ हजार कोटींची ही भरीव वाढ कृषी क्षेत्राच्या दृष्टीने निश्चितच सकारात्मक आहे. हवामान बदल संशोधन यावर केंद्र सरकारने लक्ष केंद्रित असून केली असून हवामान बदलांचा परिणाम न होणाऱ्या वाणांचा संशोधन करण्यासाठी मोठी तरतूद केली आहे. तसेच शेतकऱ्यांचे उत्पादकता वाढवण्यासाठी १०९ नवीन वाण व बदलत्या हवामानात तग धरणारे ३२ बागायती वाण उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. पुढील दोन वर्षात एक कोटी शेतकऱ्यांना नैसर्गिक ◀◀ पान २ वर

### खर तर शेतकऱ्यांना हे हव होतं..

- ❊ उत्पादन खर्चावर आधारित हवाय शेतमाला दर
- ❊ शेतकऱ्यांना हवीय मोफत वीज, मोफत पाणी
- ❊ खतं आणि किटकनाशकं माफक दरात मिळावीत
- ❊ शेतीला लागणारी औजारं जीएसटीमुक्त हवीत
- ❊ आधुनिक शेती करण्यासाठी दिर्घ मुदतीचे बिनव्याजी कर्ज हवे
- ❊ शेतीमाल हमीभाव योजनेची कठोर अंमलबजावणी व्हावी जेणे करून व्यापारयाकडून होणारी लूट थांबेल
- ❊ स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी हवी
- ❊ शेतकरी विरोधी कायदे रद्द करणे आवश्यक
- ❊ गावात गोडाऊनची व्यवस्था हवी

## नौकरी लागल्यावर तरुणांना मिळणार १५ हजार रुपये

### » केंद्र सरकारचा मोठा निर्णय; बँक खात्यात जमा होणार रक्कम

दिल्लीः केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तिसऱ्या टप्प्यातील एनडीए सरकारचा पहिला अर्थसंकल्प आज सादर केला. या अर्थसंकल्पात तरुणांसाठी मोठ्या घोषणा करण्यात आल्या. विशेष म्हणजे देशात जे तरुण पहिल्यांदाच नोकरी करणार आहेत, ज्या तरुणांची आयुष्यात पहिली नोकरी सुरु होणार असेल अशा तरुणांना केंद्र सरकारकडून १५ हजारांची आर्थिक मदत दिली जाणार आहे. पण त्यासाठी संबंधित लाभार्थी तरुणाचा पगार हा १ लाख रुपयांपेक्षा कमी असणे अपेक्षित आहे. ज्या तरुणांच्या पहिल्या नोकरीचा पगार हा १ लाखापेक्षा कमी असेल अशा तरुणांना केंद्र सरकार १५ हजार रुपयांची मदत करणार आहे.

केंद्र सरकार मध्ये पहिल्यांदा नाव नोंदणी करणाऱ्या तरुणांना १५ हजार रुपयांची आर्थिक मदत करणार आहे. ही मदत तीन टप्प्यांत केली जाणार आहे. हे पैसे डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफरच्या माध्यमातून दिले जाणार आहे. केंद्र सरकारच्या या योजनेचा फायदा देशातील २.१ लाख तरुणांना होणार आहे. त्यामुळे तरुणांना मोठा दिलासा मिळणार आहे.

#### “ मुद्रा लोनची किंमत आता २० लाखांपर्यंत

*तरुणांसाठी मुद्रा लोनची किंमत १० लाखांवरुन आता २० लाख करण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये मुद्रा योजना सुरु केली होती. तरुणांच्या स्वयंरोजगाराच्या उद्देशाने केंद्र सरकारने ही योजना सुरु केली होती. ज्या तरुणांकडे आपला व्यवसाय सुरु करण्यासाठी पैसे नाहीत अशा तरुणांना ही मुद्रा लोन दिली जात होती. याचे तीन प्रकार होते. शिशू लोन, किशोर लोन आणि तरुण लोन. आधी या योजनेतून १० लाखांचे कर्ज दिले जायचे. आता हीच रक्कम २० लाख रुपये इतकी करण्यात आली आहे.*

#### निर्मला सीतारमन नेमके काय म्हणाल्या?

सरकारच्या ९ प्राथमिक गोष्टींमध्ये रोजगार आणि कौशल्य विकाल हे देखील एक आहे. सरकार पहिल्यांदाज बजेटच्या माध्यमातून नोकरी करणाऱ्यांना मोठी मदत करणार आहे. संघटीत क्षेत्रात पहिल्यांदा नोकरी करणाऱ्या तरुणांना १५ रुपये मदत म्हणून दिले जातील. हे पैसे मध्ये रजिस्टर्ड तरुणांना मिळतील, अशी माहिती निर्मला सीतारमन यांनी दिली.

#### देशातील १ कोटी तरुणांना इंटर्नशिप मिळणार

केंद्रीय मंत्री निर्मला सीतारमन यांनी इंटर्नशिपबाबत देखील मोठी घोषणा केली. सरकार ५०० कंपन्यांमध्ये १ कोटी तरुणांना इंटर्नशिप देण्यासाठी एक योजना सुरु करणार आहे. या योजनेतून तरुणांना प्रत्येक महिन्याला ५००० रुपये इंटर्नशिप भत्ता दिला जाईल. तसेच ६००० रुपये इतर मदत म्हणून दिले जातील, असे निर्मला सीतारमन यांनी सांगितले आहे.

## आता काय जमिनी विकून निधी देऊ का?

### कॅबिनेट बैठकीत पवार मंत्र्यांवर संतापले

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या कॅबिनेट बैठकीत निधी वाटपावरून मोठा वाद



झाला. काही मंत्र्यांनी निधी मिळत नसल्याची तक्रार केली आणि यावरून उपमुख्यमंत्री अजित पवार संतापले. ''आता काय जमिनी ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२३ जुलै २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल / आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ६.०० क्विंटल | २,३०० | ३,३०० | २,७०५ |
| ज्वारी/हायब्रिड :३८.५० क्विंटल | २,२१० | २,८५० | २,३६७ |
| मूग : १.०० क्विंटल | १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : १.०० क्विंटल | ९,५०० | ९,५०० | ९,५०० |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,००१ | ४,००१ | ४,००१ |
| बाजरी: १०.०० क्विंटल | २,६०२ | ३,३५१ | २,८२३ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ६२.५० क्विंटल | ४,४६० | ४,४६० | ४,४६० |
| हरभरा: २.०० क्विंटल | ५,४०० | ६,३०१ | ५,८५० |

## आशा सेविका, गट प्रवर्तक, अंगणवाडी सेविकांना विमा कवच

### अपघाती मृत्यूसाठी दहा लाख, अपंगत्वासाठी पाच लाख रूपयांचा विमा

पुणे । प्रतिनिधी

**आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, गटप्रवर्तकांना सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, अपघाती मृत्यू आल्यास दहा लाख आणि अपंगत्वासाठी पाच लाख रुपये अनुदान देण्यात यावे असे मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. मंत्रिमंडळ बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.**

### » आधीची आश्वासने मात्र हवेतच

यासाठी प्रति वर्षी अंदाजे १ कोटी ५ लाख रुपये इतका निधी मंजूर करण्यात आला. हा निर्णय १ एप्रिल २०२४ पासून लागू करण्यात येईल. सध्या ७५ हजार ५७८ अशा स्वयंसेविका आणि ३६२२ गटप्रवर्तक कार्यरत असून, त्या आरोग्यासंदर्भात महत्त्वपूर्ण जबाबदारी सांभाळतात. हे करताना अपघाती मृत्यू आल्यास किंवा अपंगत्व आल्यास त्यांना आर्थिक सहाय्य व्हावे यासाठी हा निर्णय घेण्यात आला. दरम्यान, आशा सेविकांच्या आणि अंगणवाडी सेविकांच्या वेतनात वाढ करण्याबाबतची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या आगोदर केली होती. मात्र या घोषणेची अंमलबजावणी अद्याप करण्यात आलेली नाही. यासंदर्भात मागील मार्चच्या विधिमंडळाच्या ◀◀ पान २ वर

#### “ निवडणूकीच्या तोंडावर पोकळ घोषणा...

*आता विधानसभा निवडणूकीच्या तोंडावर आशा सेविका, गट प्रवर्तक आणि अंगणवाडी सेविका यांना विमा कवच देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आल्याने सरकारला खरेच या सुविधा द्यायच्या आहेत की, नुसत्याच पोकळ घोषणा करायच्या आहेत याबाबत संशय व्यक्त करण्यात येत आहे.*



cmyk

## अग्रलेख

# भाजपाच्या खेळी फसत चालल्यात !

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका जिंकण्यासाठी 'दोनशे पार' द्वारे सत्तेचे ध्येय साध्य करण्यासाठी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी संभ्रम दूर करून जशास तसे उत्तर देण्याचे आदेश केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी रविवारी झालेल्या भाजपच्या महाराष्ट्र अधिवेशनात दिले. महाविकास आघाडी म्हणजे औरंगजेब फॅन क्लब असून उद्धव ठाकरे हे त्याचे अध्यक्ष आहेत, शरद पवार म्हणजे भ्रष्टाचाऱ्यांचे म्होरके आहेत, पराभूत होऊनही राहुल गांधी फुग्यासारखे फुगले आहेत अशी जोराची टीका शहा यांनी करून विधानसभा निवडणुकीचा नारळ फोडला.

अजित पवार यांना सोबत घेतल्याचा मुद्दा संघाला मानवलेला नाही आणि त्याचे परिणाम महाराष्ट्रात जाणवणार याची पुरती जाणीव असलेल्या शहा यांनी हिंदुत्वाचा मुद्दा आणि विचारधारा भाजपने कधीही सोडलेली नाही असे स्पष्ट करत ध्येय साध्य करण्यासाठी तह किंवा सलगी करावी लागते अशा शब्दात समजूत काढण्याचा प्रयत्न केला आहे. खोट्या कथानकाच्या विरोधात आपल्याला लढायचे आहे आणि त्यासाठी आधी संभ्रम दूर झाला पाहिजे हे लक्षात घेऊन महाराष्ट्रातला प्रचार हिंदुत्ववादावर होईल असे संकेत शहा यांच्याकडून देण्यात आले आहेत. अजित पवार यांना सोबत घेतले असले तरी शरद पवार यांच्या विरोधात आपली भ्रष्टाचाराची लढाई सुरूच आहे आणि पवार यांनी भ्रष्टाचाराला संस्थात्मक रूप दिले असल्याचा आरोप करून अजित पवार यांना सोबत घेऊनच शरद पवार यांच्या विरोधात लढाई करावी लागणार आहे हे शहा यांनी स्पष्ट केले आहे. आता हा मुद्दा संघ आणि भाजप कार्यकर्ते किती मनावर घेतात हे लवकरच समजेल. संसदेचे अधिवेशन तोंडावर असताना आणि मित्रपक्षांनी भाजपची कोंडी केलेली असताना सुद्धा शहा महाराष्ट्रात आले होते. यावरूनच महाराष्ट्राची लढाई त्यांच्यासाठी किती महत्त्वाची आहे याचा अंदाज येतो.

लोकसभा निवडणुकीनंतर येणाऱ्या तीन राज्यांच्या निवडणुका या भाजपसाठी आणि इंडिया आघाडीसाठीसुद्धा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. चारसो पारचा नारा देणाऱ्या भाजपला आपण अडीचशेच्या आत गाशा गुंडाळायला लावला, एका अर्थाने भाजप पराभूत झाला असे वातावरण करण्यात इंडिया आघाडीला यश आले आहे. भाजप कार्यकर्तासुद्धा या मानसिकतेचा बळी ठरला आहे. यातून त्यांना बाहेर काढून पुन्हा लढायला सिद्ध करण्यासाठी महाराष्ट्रात या तिन्ही पक्षांना थेट अंगावर घेणे आवश्यक होते. अमित शहा यांनी राज्यातील मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांपेक्षा पहिला घाव स्वत:च घालावा असा विचार करून या अधिवेशनात टोकाची टीका केली. अर्थात त्याला उत्तर सुद्धा तितकेच टोकाचे मिळाले आहे. ठाकरे यांच्या वतीने बोलताना विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी जिन्हा पुढे झुकलेलेल्यांचे सरदार वगैरे टीका केली तर सुप्रिया सुळे यांनी शरद पवार यांच्यावर टीका करत असताना अमित शहांच्या मागे कोण होते? असे विचारून आदर्श घोटाळ्या प्रकरणी वादग्रस्त ठरलेले माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण सध्या भाजपमध्ये असल्याबद्दल अंगुलीनिर्देश केला. शरद पवार यांनी भ्रष्टाचाराला संस्थात्मक स्वरूप दिले या आरोपामागे यापूर्वी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पवारांना राज्य सहकारी बँकेतील आर्थिक घोटाळे आणि सहकारी साखर कारखान्यांचे खाश्रगीकरण केल्याच्या प्रकरणात गुंतवण्याचे प्रकरण आहे. एका तक्रारदाराने याबाबत न्यायालयात केलेल्या तक्रारीनुसार आर्थिक गुन्हे शाखेकडे दाखल फिर्यादीची दखल घेऊन त्यावेळी शरद पवार यांना चौकशीसाठी बोलावण्याची तयारी केली होती. तेव्हा राष्ट्रवादीतील अनेक दिग्गज फुटल्याने पवार यांचा पक्ष खिळखिळा झाला होता. अंतिम घाव म्हणून हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र ईडीने आपल्याला चौकशीला बोलवण्यापूर्वी आपणच चौकशीला हजर राहणार आहोत म्हणून पवार यांनी जाण्याची तारीख जाहीर करून नंतर आपल्याला वेळ मिळणार नाही अशी भूमिका घेतली होती. ते प्रकरण भाजपवर शेकले. सातारा येथील ऐतिहासिक पावसात भिजल्यानंतर पवार यांच्यावर मतांचा प्रचंड वर्षाव होऊन अपेक्षेपेक्षा तिप्पट आमदार निवडून आले. त्यानंतर महाविकास आघाडीची स्थापना, अजित पवार यांचा सकाळी आठ वाजताचा शपथविधी, ८० तासानंतरची माघार, उद्धव ठाकरे यांचे राज्यारोहण आणि शिवसेना, राष्ट्रवादी या दोन पक्षातील अभूतपूर्व फूट, आणि लोकसभा निवडणुकीचा निकाल इतक्या घडामोडी घडल्या आहेत. त्यानंतर पुन्हा एकदा अमित शहा यांनी शरद पवार यांना लक्ष्य केले आहे पण, मुद्दा सुद्धा तोच ठेवला आहे.

दुसऱ्या बाजूला चंद्रशेखर बावनकुळे आणि देवेंद्र फडणवीस यांनी मराठा आरक्षणाचा मुद्दा करून मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण द्यायचे का याबद्दल शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी भूमिका स्पष्ट करण्याची मागणी केली आहे. विधिमंडळाचे अधिवेशनावेळी सर्वपक्षीय बैठक बोलवण्यामागे सत्ताधाऱ्यांचा हाच डाव होता. विरोधक त्यात फसले नाहीत. भुजबळ यांना पुढे करून शरद पवार हेच या बैठकीला विरोधक जाऊ नयेत या भूमिकेमागे होते अशी टीका झाली. दुसऱ्याच दिवशी भुजबळ पवारांच्या भेटीला गेले पण पवारांनी डाव भुजबळांवर उलटवला आणि अडकले ते सत्ताधारी. मनोज जरांगे आणि लक्ष्मण हाके यांना मुख्यमंत्र्यांनी काय शब्द दिला याची जाणीव नाही आणि पन्नास लोकांमध्ये सामोपचाराची बैठक होऊ शकत नाही. त्यामुळे आवश्यक असणारे चार-पाच लोक घेऊन मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेऊ असे पवार यांनी सांगून सरकारला अडचणीत आणले. आता फडणवीस यांनी त्या पुढचा डाव टाकला आहे. तावडे आणि मुंडे यांना व्यासपीठावर प्रमुख जागी विराजमान करून मराठा आणि ओबीसीमध्ये संदेश देण्याचा प्रयत्न भाजपने केला आहे. महाराष्ट्राची निवडणूक जिंकण्याचे आणि त्यासाठी साधन म्हणून उपयोगात येणारे हे मुद्दे कितपत यशस्वी होतात हे येणारा काळ सांगेलच. पण, काश्मीर हल्ल्यानंतर अमित शहा यांच्या राजीनाम्याची मागणी करणाऱ्या संजय राऊत यांच्या अपेक्षेनुसार शहा महाराष्ट्रात स्वत: उतरले. त्यामुळे विरोधकांचा हेतू साध्य झालाच, शिवाय भ्रष्टाचाराचा आरोप करूनसुद्धा तो अद्याप सिद्ध का करता येत नाही याचे उत्तर अमित शहा यांनी देऊन आतापर्यंतच्या खेळी का फसल्या याची जणू कबुलीच दिली आहे.

# निष्ठावंत शिक्षकामुळेच संस्था नावारूपाला -कपिल आकात

**परतुर । प्रतिनिधी**

**प्रामाणिक आणि निष्ठेने काम करणाऱ्या शिक्षकांमुळेच कोणतीही शैक्षणिक संस्था खऱ्या अर्थाने नावारूपाला येत असते. शैक्षणिक संस्थेचे मोठेपण तेथे काम करणाऱ्या ध्येयवेड्या शिक्षकांमुळे होत असते. ज्ञान आणि संस्कार देण्याचे काम एक चांगला शिक्षकच करू शकलो असे प्रतिपादन मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे तरूण नेते श्री. कपील आकात यांनी येथे बोलतांना केले.**



येथील बहादुर शा स्व महाविद्यालयात सेवानिवृत्ती कार्यक्रमात ते बोलत होते. महाविद्यालयातील राज्यशास्त्राचे विभागप्रमुख प्रा.डॉ. पुरुषोत्तम वायाळ उपप्राचार्य प्रा. अशोक खरात व हिंदी विषयाचे प्रा. भगवान ठाकूर यांचा सेवागौरव कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यावेळी अध्यक्ष पदावरून श्री आकात बोलत होते समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य भारत खंदारे, माजी प्राचार्य भगवान दिरंगे, प्राचार्य दिनकर टकले, उपप्राचार्य रवी प्रधान, प्रा. संभाजी तिडके, प्रा. भागवत नाईकनवरे, अंकुश मोरे, प्रा. वामन वैद्य, कल्याण खरात, अध्यक्षपदावरून बबन गणगे, पाराजी मुळे, प्रकाश बोंबले, अखील काझी, आणि सेवानिवृत्त प्रबंध दशरथ देहडे, यांच्यासह आदीची उपस्थिती होती . आपल्या भाषणात श्री. आकात पूढे म्हणाले, शिक्षण संस्थेत शिक्षक या पदाला अनन्यसाधारण असे महत्व असून ज्ञानी आणि गूणी शिक्षक जीवनात आल्यामुळेच असंख्य विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल झालेले आहे. भविष्यात तुम्ही देशाचे राष्ट्रपती जरी झालात तरीही तुम्हाला ज्ञान आणि संस्कार देण्याचे कार्य एक चांगला शिक्षकच करू शकतो असे सांगून श्री. आकात पुढे म्हणाले, या भागातील शेतकरी, कष्टकरी यांच्या मुलांच्या शिक्षणाकरीता ही संस्था उभी राहीली असून त्यातून असंख्य मुलांना उच्च शिक्षणाची संधी मिळालेली आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. भारत खंदारे यांनी केले. प्रा. सखाराम टकले व प्रा. जालिंद इघारे यांनी यावेळी सत्कारमुर्तीबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. यशवंत दुबाले यांनी तर शेवटी डॉ. अशोक पाठक यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# महापुरुषांच्या पुतळ्याखाली बसून अर्वाच भाषेत ओबीसी कधीही बोलत नाही-लक्ष्मण हाकेंची टीका

**अंबड । प्रतिनिधी**

**काही नेत्यांच्या आदेशावरून काम करत असलेल्या मनोज जरांगे यांनी समाजात फूट पाडण्याचा उद्योग बंद करावा, अशी टीका ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी आज केली. तसेच महापुरुषांच्या पुतळ्याखाली बसून अर्वाच भाषेत कधीही ओबीसी बोलत नाही. जरांगे कोणाच्या सांगण्यावरून आंदोलन करत आहेत, असा सवालही हाके यांनी जरांगे यांना ओबीसी बचाव जनआक्रोश यात्रेच्या सुरुवात प्रसंगी केला.**




अंबड तालुक्यातील दोदडगाव येथील मंडलस्तंभाला अभिवादन करून ओबीसी बचाव जनआक्रोश यात्रेला आज दुपारी सुरूवात करण्यात आली. या दरम्यान डोणगाव, टाका रामगव्हाण, वडीगोद्री, गहीनीनाथनगर या ठिकाणी फटाक्याची आतषबाजी करत हाके आणि वाघमारे यांचे औक्षण करण्यात आले. जरांगे पुढे म्हणाले, राज्यात कुणबीच्या लाखों बोगस नोंदी झाल्या आहेत. एका व्यक्तीला एकच आरक्षण घेता येते, पण महाराष्ट्रात एक व्यक्ती तीन तीन आरक्षणाचा लाभ कसा घेऊ शकते, असा सवाल ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केला. ओबीसींचा आक्रोश सरकारपर्यंत पोहोचवण्यासाठी जनआक्रोश यात्रा सूरू केली. सरकार एका जातीसाठी साडेचार हजार कोटी व्याज भरत आहे, तुमच्या घरातून पैसे आणले का? तुम्हाला कोणी अधिकार दिला एवढे पैसे एका जातीला देण्याचा असा सवाल, हाके यांनी सरकारला केला. शासनकर्ती जमात मागास कशी असू शकते, मराठा समाज जर मागास असेल तर पुढारलेला समाज कोणता? हे या मुख्यमंत्र्यांनी जाहीर करावं, असेही हाके म्हणाले. आम्ही ओबीसींचा आवाज बनण्याचा प्रयत्न करतोय. धनगर ओबीसी आरक्षणाच्या बाहेर आहे हे सांगितलं जातंय, फोडा आणि झोडा ही त्यांची नीती आहे. ओबीसीने कधीही कायदा हातात घेतला नाही. ओबीसींच्या आरक्षणावर शरद पवार मौन बाळगून आहेत. सर्व राजकारण्यांनी पुढे येऊन बोलल पाहिजे, असे आवाहन हाके यांनी केले. जरांगे यांनी आंदोलन केल्यापासून जातीय सलोखा बिघडला आहे. राज्य सरकार तर जरांगेचे लाड करत आहे. जरांगे पाटील यांनी राजकारणात आलं पाहिजे. त्यानंतर त्यांना कोणाला पाडायचं त्यांना पाडून दाखवलंच पाहिजे असे आव्हान वाघमारे यांनी केले.

# दासखेड प्राथमिक आरोग्य केंद्राची कोट्यावधींची सुसज्ज ईमारत २ वर्षांपासून उद्घाटनाच्या प्रतीक्षेत

## कष्टकऱ्यांसाठी वरदान असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात तातडीने आरोग्य सुविधा सुरू करा

**पाटोदा । प्रतिनिधी**

**तालुक्यातील दासखेड येथील जिल्हा परिषद बांधकाम विभागा मार्फत कोट्यवधींचा खर्च करून बांधण्यात आलेली प्राथमिक आरोग्य केंद्राची सुसज्ज ईमारत २ वर्षांपासून उद्घाटनाच्या प्रतिक्षेत असुन लोकप्रतिनिधींना उद्घाटनासाठी वेळ मिळत नसल्याने धुळखात पडुन आहे. अंदाजे ५-६ हजार लोकसंख्या असलेल्या दासखेड तसेच सोनेगाव ,वैद्यकिन्ही,वैजाळा,बेडुकवाडी,पाचंग्री,येवलवाडी पारगाव, अनपटवाडी आदि गावातील गोरगरीब आरोग्य सेवेपासुन वंचित असुन त्यांना पाटोदा याठिकाणी आर्थिक भुर्दंड सहन करत उपचारासाठी जावे लागते. त्यामुळे तातडीने प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करून आरोग्य सुविधा पुरविण्यात याव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद बीड डॉ.उल्हास गंडाळ यांच्याकडे केली असुन लवकरात लवकर प्राथमिक आरोग्य केंद्र सुविधांसह सुरू करण्यात येईल असे आश्वासन डॉ. उल्हास गंडाळ यांनी दिले आहे.**

ग्रामीण भागातील जनतेला मोफत आणि चांगली आरोग्य सेवा मिळावी या उद्देशाने सुरू करण्यात आलेली प्राथमिक आरोग्य केंद्र हि वरदान ठरत आहेत .उपचाराचे प्राथमिक निदान व्हावे तसेच बाह्यरुग्ण कक्षातुन मिळणारी सेवा गोरगरीब गरजुंना परवडणारी असल्याने याठिकाणी दाखल होणाऱ्या रूग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.मोफत औषधे आणि रक्त तपासण्या होत असल्याने शेतकरी आणि कष्टकऱ्यांसाठी प्राथमिक आरोग्य आर्थिक दृष्ट्या किफायतशीर ठरत आहेत.त्यामुळे २ वर्षांपासून उद्घाटनाच्या प्रतिक्षेत असलेल्या दासखेड प्राथमिक आरोग्य केंद्रात तातडीने आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात अशी मागणी करण्यात आली आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत ग्रामीण भागात सर्वसाधारण प्रदेशात ३० हजार लोकसंख्येमागे व दुर्गम ,




आदिवासी,डोंगराळ,वाळवंटी प्रदेशात २० हजार लोकसंख्येमागे एक प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थापना करण्यात येते.ग्रामीण भागातील मनुष्यवस्तीपर्यंत किमान आरोग्य सुविधा पोचविण्याच्या उद्देशाने सरकारच्या धोरणानुसार प्राथमिक आरोग्य केंद्राचे जाळे विणण्यात आले.प्राथमिक आरोग्य केंद्रांची उभारणी आणि परिचालनाबाबतचे सर्व निर्णय मात्र राज्य सरकारच्या आरोग्य खात्यांतर्गत घेतले जातात. साधारणतः ६ उपकेंद्रासाठी एक रेफरल युनिट म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्र काम करते.प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात एक आरोग्य अधिकारी व त्यांच्या साहाय्यासाठी १४ निमवैद्यकीय ईतर कर्मचारी असतात.प्राथमिक आरोग्य केंद्र २४ तास सेवा देते . प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत तातडीच्या वैद्यकीय सेवांची उपलब्धता, बाह्यरुग्ण कक्ष, आंतररूग्णकक्ष, शस्त्रक्रिया सेवा ( कुटुंब कल्याण स्त्री शस्त्रक्रिया) स्थानिक आजारावर उद्भवणा-या आजारांवर नियंत्रण मिळवणे, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे, महत्वपूर्ण आकडेवारी गोळा करणे तसेच उपकेंद्राकडुन संदर्भित केलेल्या रूग्णांवर उपचार व प्रयोग शाळेच्या सेवा पुरवणे इत्यादी कार्य प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत केली जातात.तसेच स्वच्छता व वाहन सेवा कंत्राटी पद्धतीने देण्याबाबत शासनाचे निर्देश आहेत.

# नीटची पुनर्परीक्षा घेता येणार नाही

## सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

**नवी दिल्ली । वृतसंस्थां**

**वैद्यकीय शिक्षण प्रवेशासाठी घेतल्या जाणाऱ्या नीट परीक्षा रद्द करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर मंगळवारी (दि.२३) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. नीट चे निकाल पूर्णपणे चुकीचे आहेत आणि परीक्षेत पद्धतशीरपणे गैरप्रकार झाला आहे, हे दर्शविणारी पुरेसे पुरावे नाहीत. त्यामुळे नीटची पुनर्परीक्षा घेता येणार नाही, असे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जेबी पार्डीवाला आणि मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले.**



याचिकाकर्त्यांचे वकील आणि सॉलिसिटर जनरल यांचा युक्तीवाद झाल्यानंतर सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी निकालाचे वाचन केले. ते म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने नीट परीक्षेमध्ये झालेल्या अनियमिततेप्रकरणी ८ जुलै २०२४ रोजीच्या अंतरिम आदेशात एनटीए, केंद्र सरकार आणि सीबीआय द्वारे खुलासा मागवला होता. या प्रकरणी सीबीआयचेअतिरिक्त संचालक कृष्णा तपासाच्या स्थिती सांगण्यासाठी न्यायालयात हजर झाले होते. नीट युजी चे निकाल पूर्णपणे चुकीचे आहेत आणि परीक्षेच्या पावित्र्यामध्ये पद्धतशीरपणे उल्लंघन झाले आहे, हे दर्शविणारी पुरेसे पुरावे नाहीत. त्यामुळे ची पुनर्परीक्षा घेता येणार नाही. असे न्यायालयाने म्हटले. नीट पेपरफुटी पाटणा आणि हजारीबाग येथे झाली होती. सीबीआय पेपरफुटीचा तपास सुरू ठेवणार आहे. वैद्यकीय प्रवेशासाठीचे समुपदेशन आणि इतर प्रवेश प्रक्रिया सुरू ठेवण्यासाठी तसेच भविष्यातील परीक्षा आयोजित करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे देईल, असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

# सर्व स्तरातील घटकांना न्याय देणारा समृध्द अर्थसंकल्प-आ.पंकजाताई मुंडे

**मुंबई । प्रतिनिधी**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला आजचा अर्थसंकल्प हा देशातील महिला, तरुण, नोकरदार तसेच शेतकऱ्यांसह मोल मजुरी करणाऱ्या सर्वसामान्य जनतेच्या हिताला प्राथमिकपणे प्राधान्य देणारा असा समृध्द अर्थसंकल्प आहे अशा शब्दांत भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.**



प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेअंतर्गत पाच वर्ष मोफत अन्नधान्य', गरिबांना प्रधानमंत्री आवास योजनेतून एक कोटी घरे, नैसर्गिक शेती आणि शेतीच्या उत्पादकतेत वाढ करण्याचे ध्येय, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी माफक व्याजावर दहा लाखांचे कर्ज, युवकांना पहिल्या नोकरीत सरकारकडून अर्थसाह्य तसेच नोकरदारांना आयकरातून सूट, सर्व राज्य सरकारांना १५ वर्षांसाठी बिनव्याजी कर्ज अशा विविध महत्वाकांक्षी व जनतेचे जीवनमान सुधारणेसाठी वैविध्यपूर्ण पैलूंचा समावेश असणारा सर्वसमावेशक असा अर्थसंकल्प जाहिर केल्याबद्दल केंद्र सरकार आणि प्रधानमंत्री श्री.नरेंद्रजी मोदी यांचे धन्यवाद असं पंकजाताई यांनी म्हटलं आहे.

## पान १वरून...

### उशीरा का होईना केंद्राचे शेतकऱ्यांकडे

चांगला भाव मिळत असल्याने नैसर्गिक शेतीबाबत मोदी सरकारने महत्वाचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीसाठी शेतकऱ्यांना मदत करण्यात येणार असून यासाठी ग्रामपंचायत केंद्रस्थानी असणार आहे. देशात १० हजार बायो रिसर्च सेंटर तयार केली जातील. ३२ पिकांच्या १०९ जाती आणल्या जाणार आहेत. देशातील ४०० जिल्ह्यातील पीकांचे डिजिटल सर्वेक्षण करण्यात येईल. देशातील १ कोटी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीसाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे. नैसर्गिक शेतीबाबतचे प्रशिक्षण आणि माहिती शेतकऱ्यांना दिली जाईल. यानंतर शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीचे प्रमाणपत्र देखील देण्यात येणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. गेल्या १० वर्षात मोदी सरकारने शेतकऱ्यांकडे कानाडोळा केल्याने त्यांना त्याची लोकसभा निवडणुकीत किमत मोजावी लागली आहे. त्यामुळे उशिरा का होईना केंद्र सरकारला शेतकऱ्यांची आठवण या अर्थसंकल्पातून झाल्याचे दिसून आले आहे.

---------

### बजेटमधून महाराष्ट्राला

फडणवीस यांनीही, भारताच्या भविष्यावर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करणारा आणि भारतीय अर्थव्यवस्थेच्या ताकदीचा अनुभव करून देणारा अर्थसंकल्प असल्याचे म्हटले. मात्र, विरोधकांकडून या बजेटमधून महाराष्ट्राला काहीच मिळाले नसल्याची टीका करण्यात येत आहे. त्यावरही, आता देवेंद्र फडणवीसांनी ट्विट करुन प्रत्युत्तर दिलं आहे. या केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्रासाठी असलेल्या तरतुदींची ही प्राथमिक यादी, फेक नॅरेटीवच्या राजकरणाच्या पलीकडे जाऊन विरोधकांनी अर्थसंकल्प समजून घेण्याची गरज अधोरेखित करणारी आहे, असे फडणवीस यांनी म्हटले आहे. फडणवीस यांनी एक इमेज ट्विट करुन महाराष्ट्राला काय मिळाले हे सांगितलं असून अजून बरेच काही मिळाल्याचंही त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, भाजपच्या ट्विटर अकाऊंटवरुनही ट्विट करत उद्धव ठाकरेंवर पलटवार करण्यात आला आहे.

------------

### रेल्वेत तीन नवीन आर्थिक

कॉरिडॉर बांधले जातील, अशी घोषणा केली आहे. हे कॉरिडॉर ऊर्जा, खनिजे आणि सिमेंटसाठी असतील. या प्रकल्पाची ओळख पंतप्रधान गतिशक्ती योजनेअंतर्गत करण्यात आली आहे. यामुळे पॅसेंजर गाड्यांचे कामकाज सुधारेल आणि गाड्यांमधील प्रवास सुरक्षित होईल. ४० हजार सामान्य रेल्वे बोगी वंदे भारत मानकात रूपांतरित केल्या जातील.

गेल्यावर्षीच्या अर्थसंकल्पात मोदी सरकारने रेल्वेवर सर्वाधिक भर दिला होता. २०२३ च्या एकूण ४५ लाख कोटी रुपयांच्या बजेटमध्ये रेल्वेचा वाटा २.४ लाख कोटी रुपये होता. मोदी सरकारच्या कार्यकाळात रेल्वेसाठी अर्थसंकल्पातील तरतूद सातत्याने वाढली आहे.

--------------

### कृषी विकासाला प्राधान्य

शेतीकडे वळविण्यात येणार आहे. या निर्णयामुळे ग्राहक आणि शेतकरी दोघांच्या गरजा भागवल्या जाणार आहेत. भाजीपाला उत्पादन आणि मूल्य साखळी तसेच साठवण आणि विपणन व्यवस्थेसाठी शेतकरी उत्पादक कंपनी सहकारी संस्था आणि स्टार्टअप ला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. पुढील तीन वर्षात शेतकऱ्यांचा आणि शेतजमिनीचा कव्हरेज डिजिटल पब्लिक इन्फ्रा मधून करण्यात येणार आहे. देशातील ४०० जिल्ह्यांना डिजिटल क्रॉप सर्वे मध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. किसान क्रेडिट कार्ड ची संख्या वाढवली जाणार आहे. यांना क्रेडिट गॅरंटी दिली जाणार असून याद्वारे कृषी उद्योगांना भरारी मिळेल तसेच या क्षेत्रात रोजगाराची देखील मोठ्या प्रमाणावर निर्मिती होईल. एकूणच कृषी क्षेत्राचा विकास हीच देशाची प्राथमिकता असल्याचे सिद्ध करणारा हा अर्थसंकल्प असून या अर्थसंकल्पाबद्दल देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जी तसेच अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे मी अभिनंदन करतो अशा शब्दात कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

--------------

### आता काय जमिनी

विकून निधी देऊ का?'' या शब्दात त्यांनी आपला संताप व्यक्त केला. अजित पवारांच्या या वक्तव्याने कॅबिनेटमध्ये एकच खळबळ उडाली आहे. आता आगामी काळात या वादाचे परिणाम काय होतील याची चर्चा सुरू झाली आहे. राज्याच्या विकासासंदर्भात चर्चा चालू असताना काही मंत्र्यांनी निधीबद्दल तक्रार केली. हे ऐकून अजित पवारांनी खडसावले. आपल्या मतदारसंघात कामे करण्यासाठी निधी मिळत नाही, यावरून मंत्री नाराज असल्याची चर्चा आहे. दोन महिन्यांवर निवडणुका असताना आमदारांना त्यांच्या मतदारसंघात काम करण्यासाठी निधीची गरज आहे. या वादामुळे महायुतीत वाद निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मंत्रालयात मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये निधी वाटपावरून सरकारमध्ये खडाजंगी पाहायला मिळाली. अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडून नाराजी व्यक्त करण्यात आली. गिरीश महाजन, गुलाबराव पाटील, विजयकुमार गावित या मंत्र्यांनी निधीची मागणी केली होती, पण मंत्र्यांनी मागितलेल्या अतिरिक्त निधीला अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडून नकार देण्यात आला. राज्यात सध्या सात महत्त्वाच्या योजना सरकारकडून राबवण्यात येत आहेत. त्यामुळे जवळपास एक लाख कोटी रुपये त्यात खर्च होत आहेत. त्यामुळे निधीसाठी पैसे कुठून उभारणार? असा सवाल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उपस्थित केला. दरम्यान, निधीच्या संदर्भात अनेक वरिष्ठ मंत्र्यांनी आपली नाराजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे व्यक्त केली. अजित पवारांच्या या वक्तव्यानंतर महायुतीतील तणाव वाढला आहे आणि आगामी निवडणुकांसाठी हा वाद कसा मिटणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

---------------

### आशा सेविका, गट प्रवर्तक,

अधिवेशनात विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी राज्य सरकारला जाबही विचारला होता. मात्र त्यावर नंतर अंमलबजावणीबाबतची घोषणा करू असे अर्थमंत्री अजित पवार यांनी सांगत याप्रकरणी वेळ मारून नेली होती. त्याचबरोबर आशा सेविकांना मोबाईल देण्याची घोषणाही करण्यात आली होती. त्याचीही अद्याप पूर्तता झाली नाही.

## प्रोजेक्ट वृक्षदान अंतर्गत हसनाबाद येथे ४०० फळझाडांचे वाटप



**किल्ले धारूर :–** तालुक्यातील हसनाबाद येथे प्रोजेक्ट वृक्षदान या संस्थेअंतर्गत चारशे फळझाडांचे वाटप करण्यात आले यामध्ये आंबा, चिकू, आवळा, पेरू ,शेवगा हादगा ,अडुळसा,बेलवड पिंपळ आदी देशी झाडांचे वाटप करण्यात आले.

यंदा धरणी मातेचा पारा ४५ सेल्सिअसच्या वर गेलेला असून दिवसेंदिवस पृथ्वीतलावरच्या वृक्षांची संख्या कमी होत असल्याने हा पारा वाढत आहे याच उद्देशाने प्रोजेक्ट वृक्षदान या संस्थे अंतर्गत धारूर तालुक्यातील हसनाबाद येथे आंबा,चिकू ,चिंच ,जांभूळ ,निंबोणी, आवळा,शेवगा,वड ,पिंपळ,कदंब ,उंबर ,पेरू बेल यांच्यासह अन्य देशी झाडांचे वाटप करण्यात आले व गावकऱ्यांनी वाटप करण्यात आलेली झाडे आम्ही सांभाळू किंवा त्याचे पालन पोषण योग्यरीत्या करू असा संस्थेला शब्द दिला यावेळी वृक्षमित्र गणेश सोळंके,हसनाबाद ग्रामपंचायत चे सदस्य वृक्षमित्र नवनाथ नखाते, उपसरपंच शिवाजी सोळंके,सचिन नखाते,आरुण नखाते,रमेश नखाते,महेश सोळंके,शिवाजी कोठुळे,संजय लांडगे, सुधाकर मुठाळ,आबासाहेब नखाते, मोहन नखाते,यांच्यासह अन्य वृक्षप्रेमी व ग्रामस्थांची उपस्थिती होती.

# सर्वांगिण विकास आणि शांततेकरिता निवडणूक लढविणार – राजेसाहेब देशमुख

परळी । प्रतिनिधी

परळीचा सर्वांगीण विकास श्री शेत्र प्रभू वैजनाथ यांच्या नगरीला गत वैभव प्राप्त करून देण्यासाठी तसेच सर्व धर्मीय सर्वसामान्य माणूस यांना सुख समाधान आनंदी व भयमुक्त वातावरणात जगता यावे परळी शहर व मतदार संघात शांतता सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आपण निवडणूक लढवणार आहोत अशी घोषणा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी मंगळवार दिनांक २३ जुलै रोजी आयोजित पत्रकार परिषदेत केली.




बीड जिल्ह्यात आम्ही भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय नेत्या खासदार सौ. रजनीताई पाटील, प्रदेशाध्यक्ष आमदार नानाभाऊ पटोले, माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली काम करीत आहोत. लोकसभा निवडणुकीतील लक्षवेधी विजयानंतर महाविकास आघाडीवरील सर्वसामान्य जनतेचा विश्वास कायम आहे. हे पुन्हा एकदा दिसून आले आहे. बीड जिल्ह्यात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडे समविचारी पक्ष व संघटनेतील नेते आणि कार्यकर्ते यांचा ओढा वाढत आहे. अनेक जण काँग्रेस पक्षाच्या संपकांत आहेत. काँग्रेस पक्ष विधानसभा निवडणुक ताकदीने लढविणार आहे. याचाच एक भाग म्हणून मी स्वतः परळी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष देशमुख यांनी दिली.

ते पुढे म्हणाले की, बारामती, लातूर, पुणे शहराच्या धरतीवर परळी शहरासह संपूर्ण मतदारसंघाचा विकास करणे आणि परळी शहर व मतदारसंघात शांतता, सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आपण निवडणूक लढविणार आहोत. आपण निवडणूक लढवावी अशी परळी विधानसभा मतदारसंघातील सर्वधर्मिय मतदार आणि सर्वसामान्य माणसाची प्रामाणिक इच्छा आहे.

त्यांच्या भावनेचा आदर करून तसेच परळीचा सर्वांगिण विकास, श्रीक्षेत्र प्रभु वैद्यनाथ यांच्या नगरीला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी आपण परळी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविणार आहोत. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष आणि महाविकास आघाडी तर्फे निवडणूक लढविणार असल्याचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी यावेळी सांगितले. याबाबत मी व माझ्या सहकाऱ्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या प्रत्येक पदाधिकारी व कार्यकत्यांनी राष्ट्रीय नेत्या खासदार सौ. रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रभारी रमेशजी चेन्नीथला प्रदेशाध्यक्ष आ. नानाभाऊ पटोले यांना भेटून आपणांस उमेदवारी देण्याची विनंती केली आहे. तसेच या विषयावर महाविकात आघाडीला तिकीट मागणार असून याबाबत आपण महाविकास आघाडीचे ज्येष्ठ नेते खा. शरदचंद्र पवार साहेब, माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब, प्रदेशाध्यक्ष आ. जयंतराव पाटील, खा. सुप्रियाताई सुळे, खा. संजयजी राऊत यांच्यासह इतर नेत्यांची भेट घेऊन महाविकास आघाडी तर्फे अधिकृत उमेदवारी मागणार आहोत. मी विधानसभा निवडणुक लढवावी अशी परळी मतदारसंघातील सर्वधर्मिय लोकांची जनभावना आहे. तसेच या भेटीत परळी मतदारसंघातील सध्याच्या. परिस्थितीची माहिती ही आपण त्यांना देणार आहोत. अशी माहिती काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी मंगळवारी परळी वैजनाथ येथे आयोजित पत्रकार परिषदेतून दिली. यावेळी शहराध्यक्ष सय्यद हनीफ बहादुर भाई,तालुका अध्यक्ष अनिल जाधव , उपाध्यक्ष, शुभम देशमुख ,वैजनाथ गडेकर, इथे शाम खातिब, प्रवाक्ते बद्दरभाई, ज्येष्ठ नेते प्रकाश देशमुख,दीपक शिरसाट, समंदर खान पठाण रणजित देशमुख,निर्मळ पाटील इत्यादी काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

### सलग सत्तेत तरीही, परळीचा विकास नाही

परळी वैजनाथ हे सुप्रसिद्ध धार्मिक स्थळ आहे. या शहरात दरवर्षी लाखो भाविक दर्शनासाठी येतात. रेल्वे, वीज निर्मिती सारखे महत्त्वाचे प्रकल्प असून ही आज परळी शहरात कायद्याचे राज्य नाही. शिक्षणाच्या सोयी व रोजगार उपलब्ध नाही. अधिकारी, नौकरदार, व्यापारी, महिला, मुली, विद्यार्थी, अल्पसंख्यांक हे सर्व घटक आज दहशतीखाली जीवन जगत आहेत. शहरातील श्रीमंत, ऐपतदार लोक अंबाजोगाई, लातूर, पुणे येथे कुटुंबासह स्थलांतरित झाले आहेत. शेतकरी अनुदान व पीक विम्यापासून वंचित आहेत. परळीत उद्योग, व्यवसाय प्रगतीपथावर नाहीत हे चित्र आता बदलले पाहिजे, नेहमीच परळीकरांच्या आशिर्वादावर केवळ स्वतःच मोठे झालेल्यांना सलग सत्तेत राहून ही परळीचा विकास करता येवू नये ही मोठी शोकांतिका आहे. त्यामुळे या पुढे परळीचा सर्वांगिण विकास व्हावा, श्रीक्षेत्र प्रभु वैद्यनाथ यांच्या नगरीला गतवैभव मिळावे, सर्वधर्मिय नागरिक, सर्वसामान्य माणूस यांना सुख, समाधान, आनंदी व भयमुक्त वातावरणात समृद्ध जीवन जगता यावे, परळी मतदारसंघातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण व नागरिकांना अद्ययावत आरोमा सेवा, सुविधा उपलब्ध व्हावी, जनसेवेच्या सर्वच क्षेत्रात परळी शहराचा नांवलौकिक व्हावा, शहरासह मतदारसंघात शांतता, सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आपण परळी मतदारसंघातील लोकांच्या प्रेमापोटी, लोकभावनेचा आदर करून विधानसभा निवडणूक लढविणार आहोत.




पिंपळवंडी:–बीड–अंमळनेर–अहमदनगर या महामार्गावर ''बस सेवा'' अगदी बोटावर मोजण्याएवढीच आहे.त्यामध्येही पाटोदा व आष्टी आगाराच्या काही बसच्या अवस्था खूपच दयनीय झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. या आगाराची आष्टी–अंमळनेर–रायमोह ही नियमित फेरा मारणाऱ्या एसटी च्या खिडक्यांना काचा,आडवे गज तुटलेले तर दरवाज्याची तीच अवस्था अनेक ठिकाणी पत्रे जोडून डागडूजी केली आहे अशा डबघाईला आलेल्या एसटीतून त्रासदायक प्रवास करावा लागतो.

## लॉर्ड महावीर इंग्लिश स्कूलमध्ये वाचन सप्ताह हा उपक्रम संपन्न

कडा । प्रतिनिधी

लॉर्ड महावीर इंग्लिश स्कूल,कडा.या सी. बी. एस. ई. बोर्ड मान्यताप्राप्त शाळेमध्ये वाचनालयाचे जनक स्वर्गीय.पी. एन.पनिक्कर यांच्या स्मरणार्थ वाचन सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले होते. मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी त्याचबरोबर वाचन संस्कृती वृध्दींगत झाली पाहिजे हा मुख्य उद्देश यामागे असून या उपक्रमाअंतर्गत वाचन स्पर्धा, कथा – कथन स्पर्धा , वाचनालय भेट , जलद वाचन स्पर्धा , लेखक संवाद , पुस्तक भेट अश्या वेग वेगळ्या उपक्रमाचे आयोजन या सप्ताहामध्ये करण्यात आलेले होते. मुलांनी कडा येथील सार्वजनिक वाचनालयाला प्रत्यक्ष भेट देऊन वाचनाचा आनंद



घेतला त्याचबरोबर वाचनालयातील वेगवेगळी वर्तमानपत्रे, दैनिके, मासिके, कथा ,कादंबरी यांची माहिती मुलांनी घेतली. त्याचबरोबर वाचलांलयाचे दैनंदिन कामकाज व नियमावली जाणून घेतली.

त्याच बरोबर याच सप्ताहामध्ये लेखक संवाद या उपक्रमाअंतर्गत आष्टी तालुक्यातील प्रसिद्ध कवी व लेखक श्री हरिष हातवाटे सर यांनी मुलांना काव्य लेखन ,कथा लेखन कसे करावे या बद्दल अतिशय उत्कृष्ट मार्गदर्शन मुलांना त्यांनी केले. अशाप्रकारे वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन या सप्ताहामध्ये शाळेत घेण्यात आले.हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लिटरेचर क्लब चे प्रमुख विद्यार्थी अजिंक्य साळुंके आणि दिशा गांधी या विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली.

# राष्ट्रीय समाज पक्ष सर्व जाती-धर्मांना घेऊन जाणारा-अण्णासाहेब मतकर

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील कुसळंब येथे गुरुपौर्णिमा निमित्त श्री.साईबाबा मंदिर येथे राष्ट्रीय समाज पक्षाची महत्वाची बैठक होऊन तालुका कार्यकारणी जिल्हाध्यक्ष आण्णासाहेब मतकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाली.याप्रसंगी आण्णासाहेब मतकर यांनी साईबाबांचा आशिर्वाद घेऊन उपस्थित बांधवांना मार्गदर्शन केले.या प्रसंगी ते म्हणाले की,राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर हे सर्व समाजातील बांधवांना घेऊन जाणारे नेतृत्व असुन हा पक्षच सर्वांना न्याय देणारा असल्याचे प्रतिपादन जिल्हाध्यक्ष आण्णासाहेब मतकर यांनी केले.त्यांच्या मार्गदर्शनाखाली काही पदाधिकाऱ्यांचा प्रवेश व निवडी यावेळेस घेण्यात आल्या.



राष्ट्रीय समाज पक्षात सर्व जाती–धर्मातील लोक गुण्यागोविंदाने एकत्र काम करतात.त्यामुळे सर्व जाती– धर्मांना सोबत घेऊन जाणारा हा एकमेव पक्ष आहे.पक्षाचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री महादेव जानकर साहेब यांनी १८ पगड जातींना सोबत घेऊन पक्षाचे नाव गाव–तांड्यावर काम वाढून सर्वसामान्य माणसांना न्याय राष्ट्रीय समाज पक्षाने गाव ते शाखा व घर तिथे कार्यकर्ता ही मोहीम हाती घेतली ७० टक्के पक्षाची बांधणी झाली आहे.त्यामुळे राष्ट्रीय समाज पक्ष येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये स्वबळावर विधानसभा निवडणुका लढवणार आहे.आज सर्वसामान्य लोकांना प्रस्थापित पक्षावर कुठलाही विश्वास राहिलेला नाही.सर्वसामान्य प्रश्न सोडवायचे असतील तर बीड जिल्ह्यातील मायबाप जनतेने राष्ट्रीय समाज पक्षाला ताकद देऊन सर्वसामान्य काम करण्यासाठी एक वेळेस राष्ट्रीय समाज पक्षांच्या उमेदवाराला मोठ्या मताधिक्याने निवडून आणलं पाहिजे.मोठे लोक आपले काम करत नाहीत आणि आपण निवडणुका जवळ आले की, त्यांचच ऐकतो त्यामुळे यावेळेस आपणास बदल करण्याची संधी आलेली आहे आणि त्यापण करतील ही अपेक्षा जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर यांनी कार्यकर्त्यांच्या समोर मांडली आहे.

या ठिकाणी काही कार्यकर्त्यांचा प्रवेश घेण्यात आले. श्रीमती कविता राहिंज तालुका अध्यक्ष रासपा पाटोदा,श्रीमती सुरेखा बेद्रे तालुका उपाध्यक्ष रासपा पाटोदा, श्रीमती अनिता महारनवर तालुका सचिव रासपा पाटोदा,विकास घुगे अंमळनेर सर्कल प्रमुख,अशोक शिंगटे अंमळनेर गणप्रमुख,बाळासाहेब आश्राजी सानप सौताडा गण प्रमुख, मिसाळ गहिनीनाथ व इतर पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या.तसेच धनवटे व महारनवर यांनी राष्ट्रीय समाज पक्षांच्या जिल्हाधिकाऱ्यांचा व कार्यकर्त्यांचा मानसन्मान केला.त्याबद्दल राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने त्यांचे खूप खूप धन्यवाद. उपस्थित राष्ट्रीय समाज पक्ष जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर, विद्यार्थी जिल्हाध्यक्ष परशुराम काशिद, तालुका अध्यक्ष पाटोदा आसाराम महारनवर,युवक तालुका अध्यक्ष पाटोदा कल्पेश भोंडवे,अॅड.बाळासाहेब सोलनकर, भाऊसाहेब दिंडे आष्टी तालुका अध्यक्ष,आष्टी तालुका उपाध्यक्ष लक्ष्मण भिसे,पत्रकार अंकुश गवळी या संस्थेचे चालक धनवटे साहेब तसेच सर्व महिला मंडळ पुरुष मंडळ बहुसंख्येने उपस्थित होते.

## बीडमध्ये छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे क्रोमा–टाटा एंटरप्रायजेसचा भव्य शुभारंभ!

बीड । प्रतिनिधी

अनेक वेगवेगळ्या इलेक्ट्रॉनिक उत्पादनाची विशाल श्रेणी उपलब्ध असलेली रिटेल स्टोअर क्रोमा बीडमध्ये छत्रपतीशिवाजी महाराज चौक जवळ कल्याण पिंगळे दाजी कॉम्प्लेक्स येथे सुरू झालेले आहे. बीड शहरातील क्रोमाचे हे पहिलेच स्टोर आहे. तसेच भारतातील पहिले व ग्राहकांचा विश्वास संपादन केलेले ओम्मी चॅनल इलेक्ट्रॉनिक्स रिटेलर टाटा समूहातील क्रोमाने भारतामध्ये कलाकाराचा आणि ऊसतोड कामगाराचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या बीडमध्ये आपले पहिले स्टोर बीडमध्ये छत्रपती शिवाजी महाराज चौक कल्याण पिंगळे दाजी कॉम्प्लेक्स येथे सुरू केले आहे याची घोषणा केली आहे. क्रोमा बीड स्टोअर मध्ये ५५० पेक्षा जास्त ब्रँडसची १६००० पेक्षा जास्त उत्पादने आहेत. बीड जिल्ह्यातील वाहतूक प्रामुख्याने रस्ते मार्गाने चालते, क्रोमा बीडचे स्टोर बीड बस स्टॅन्ड पासून फक्त ६ मिनिटाच्या पाई अंतर आहे. तसेच जवळील तालुक्या करीता गेवराई ४० मिनिटाच्या अंतरावर आहे व



अंबाजोगाई केज माजलगाव करीत अंतर १ तासाचे आहे. परळी वैजनाथ आष्टी २ तास १५ मिनिटाची अंतर लागतात. बीडमध्ये क्रोमाचे नवे स्टोर ९२०८ चौरस फुटामध्ये विशाल जागेत बसविण्यात आले आहे. टीव्ही, स्मार्टफोन, डिजिटल डिव्हाइसेस, कूलिंग, उत्पादने घरगुती उपयोगाची उपकरणे तसेच ऑडिओ चे संबंधित इतर अॅक्सेसरीज अशा विविध प्रकारची आत्याधुनिक या स्टोर मध्ये उपलब्ध असेल क्रोमाचे जाणकार तज्ञ स्टोअर मध्ये उपस्थित असल्याने ग्राहकांना खरेदी करताना आवश्यक ती सर्व माहिती व मदत सहज मिळते. क्रोमामध्ये करण्यात आलेल्या खरेदीचे जास्तीत जास्त लाभ मिळण्यासाठी ग्राहकांना खरेदीनंतरच्या सेवाबाबत माहिती करून घेऊ शकतात.किंवा तज्ञ सल्ला मिळण्यासाठी स्टोअर असोसियटची मदत घेऊ शकतात. विशेष आयोजित करण्यात येणाऱ्या लर्निंग ऍक्टिव्हिटीज मध्ये सहभागी होऊ शकतात.क्रोमा बीड स्टोअर चा भव्य उद्घाटन सोहळा २१ जुलै २०२४ रोजी संपन्न झाला आहे. आपल्या बीड क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवर पाहुने आमदार संदीप भैय्या क्षीरसागर, सुनील दादा धांडे, सय्यद सलीम, मारुती खेडकर तरुण उद्योजक मेघराज पिंगळे यांनी या कार्यक्रमाला हजर राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली या उद्घाटन प्रसंगी बीड मध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आणि समुदायाच्या प्रचंड पाठिंबा आणि उत्साह दिसून आला.

## कुसळंबची प्रतिक्षा झाली पहिली अधिकारी

पिंपळवंडी । प्रतिनिधी

आज भारतात सर्व क्षेत्रात स्त्रियांनी आपले कर्तृत्व सिद्ध केलेले आहे.आज ती विमान चालक,इंजिनियर,प्राध्यापक,राष्ट्रपती, खासदार,मंत्री,मुख्यमंत्री,राज्यपाल, उद्योगपती अशा अनेक पदावर कार्यरत आहेत.त्याशिवाय अनेक सामाजिक संस्था चालवत आहेत.अगदी त्याच पार्श्वभूमीवर कुसळंब येथील माजी सभापती किसनराव पवार यांची नात प्रतिक्षा बाळासाहेब पवार या मुलीने या वर्षांमध्ये सलग तीन वेळा स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन केले.त्यामध्ये प्रमुख्याने सुरुवातीला जानेवारी २०२४ मध्ये तलाठी या पदावर ती त्यांची निवड झाली.त्यानंतर जून २०२४ मध्ये नगरपरिषद कर निर्धारक प्रशासकीय अधिकारी या पदी त्यांची निवड झाली.आणि आता परत १६ जुलै २०२४ मध्ये मार्फत (राज्य कर निरक्षक) या पदी त्यांची निवड झाली.या वर्षातली ही यशस्वी घोडदौड पाहून समस्त गावकरी कुसळंकर सह सर्व क्षेत्रातील लोक कौतुक करताना दिसत आहेत...!



प्रतिक्षा खऱ्या अर्थाने कृतीशिल आदर्श!

संविधानातील कायद्याच्या समानतेच्या मूलतत्त्वावर विकासाची समान संधी मिळाल्यामुळे स्त्रिया आज सक्षम झालेले आहेत .. त्याचे उदाहरण अनेक आहेत परंतु,आज कुसळंब येथिल मा.सरपंच,श्री.खं.मा.व उ.मा. विद्यालय अध्यक्ष बाळासाहेब किसनराव पवार यांची जेष्ठ कन्या प्रतिक्षा खऱ्या अर्थाने कृतीशिल आदर्श ठरलेली आहे.त्यांच्या या यशस्वी वाटचालीस खूप शुभेच्छा आणि त्याचबरोबर लवकरच आयएएस होण्याचा निर्धार लवकरच पूर्ण होवो.

–अतुल शेलार,सामाजिक कार्यकर्ता कुसळंब

लवकरच क्लास वन अधिकारी

प्रतिक्षाची या वर्षातील तिसऱ्यांदा शासकीय पदी निवड झाल्याबद्दल आम्हा सगळ्यांना खूप अभिमान वाटतो प्रतिक्षाने केलेल्या कष्टाचे फळ तिला मिळाले आहे.तिचं क्लासवन होण्याचं स्वप्न सुद्धा लवकरच पूर्ण होईल हे तुझ्या कष्टावरून जिद्दीवरून दिसून येत आहे.पण जेव्हा प्रतिक्षा क्लास वन अधिकारी होईल आणि तिच्या हातून समाजाची गोरगरिबांची सेवा होईल त्यावेळेस सर्वात जास्त आनंद आणि समाधान मला असेल आणि हे सर्व तुझ्या हातून घडावं यासाठी खंडेश्वर चरणी प्रार्थना करतो...

– बाळासाहेब पवार
माजी सरपंच कुसळंब.


पान ६ वरून...


### राज्यातील पत्रकारांच्या

परिवर्तन घडवते. यात्रा पत्रकारांचे प्रश्न सरकारला सांगण्यासाठी आणि पत्रकारांना समजुन घेण्यासाठी संधी प्रदान करणार आहे. रविवार दि.२८ जुलै रोजी नागपूरच्या दिक्षाभूमीतून यात्रेचा शुभारंभ होणार असुन यात्रेचा समारोप मुंबई मंत्रालय येथे होणार आहे असे पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

बीड येथील हॉटेल निलकमल येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी, लोकशाहीच्या बळकटीसाटी काढण्यात येणार्या दिक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा संदर्भात पत्रकार परिषद घेवून सविस्तर माहिती दिली. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ संपादक राजेंद्र आगवान,ज्येष्ठ संपादक सुनील क्षीरसागर,पत्रकार संघाचे मार्गदर्शक संतोष मानूरकर, संपादक संघाचे अध्यक्ष नरेंद्र कांकरिया,ज्येष्ठ पत्रकार महेश वाघमारे,ज्येष्ठ फोटोग्राफर विश्वनाथ माणूसमारे, लोकपत्रकार भागवत तावरे, संजय मालानी, बालाजी मारगुडे, दिनेश लिंबेकर,शेखर कुमार,वैभव स्वामी यांची प्रमुख उपस्थिती व्यासपीठावर होती. यावेळी पत्रकार संवाद यात्रे संदर्भात अधिक माहिती देताना पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे म्हणाले की, भारतीय लोकशाहीत वृत्तपत्र, पत्रकार आणि प्रसारमाध्यमात काम करणारे प्रतिनिधी हा चौथा स्तंभ मानला जातो. पण समाजमाध्यमांचा वाढता प्रभाव आणि केंद्र व राज्य सरकारची एकूण धोरणे लक्षात घेता जिल्हा, तालुका, गाव पातळीवरील प्रसारमाध्यम व्यवस्था कमजोर करण्याचेच प्रयत्न होत आहेत. वैयक्तीक संघटनेच्या माध्यमातून माध्यम क्षेत्रातील निर्माण झालेले प्रश्न सातत्याने सरकारी व्यवस्थेसमोर मांडून पाठपुरावा केल्यानंतरही या प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्याची भूमिका घेतली जाते. कोरोना महामारीनंतर वृत्तपत्र व्यवसाय अडचणीत आला आहे. सरकारने अनेक क्षेत्रांना मदत केली पण वृत्तपत्र क्षेत्राला मदत केली नाही. कोरोनात दिडशेपेक्षा अधिक पत्रकारांचा मृत्यू झाला. घोषणा करूनही सरकारने मदत केली नाही. जाहिरातीवरील करापासून ते छपाईच्या कागदापर्यंत आणि पत्रकारांच्या अधिस्विकृतीपासून ते पेन्शन योजनेपर्यंत सातत्याने निवेदने, पाठपुरावा केल्यानंतरही शासन गांभिर्याने विषय समजून घेत नाही. मात्र मतपेटीचा विचार करून विविध घटकांना हजारो कोटी रूपयांच्या योजना दिल्या जातात. या योजना लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम करणार्या घटकाला मात्र वंचित ठेवले जात आहे. पत्रकारही प्रमुख घटक आहे, तो ही मतदार आहे याची आठवण करून देण्यासाठी आणि शांततेच्या संवाद मार्गाने सरकारला पत्रकारांचे प्रश्न सांगण्यासाठी ही यात्रा आहे. राजकीय व्यवस्थेवर अंकुश आणि समाजाचे प्रश्न मांडणार्या घटकाला आपले प्रश्न मांडण्यासाठी यात्रा काढावी लागत आहे हे दुर्दैव. लोकशाहीत स्थानिक पातळीवरील पत्रकार ही व्यवस्था सक्षम राहिली तरच सामान्य माणसाचा आवाज बुलंद राहिल आणि व्यवस्थेवर अंकुश राखता येईल. यासाठी समाजातील विविध घटकांनीही पत्रकारांच्या मागण्यांसाठी पाठींबा द्यावा ही अपेक्षा आहे. दि.२८ जुलै २०२४ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दिक्षाभूमी नागपूर येथून यात्रेचा शुभारंभ होईल. नागपूर, खान्देश आणि उत्तर महाराष्ट्र या तीन विभागातील जिल्हे आणि तालुक्यातून ही यात्रा शिर्डी येथे ३ ऑगस्ट रोजी येणार आहे. यात्रे दरम्यान प्रत्येक जिल्हा, तालुक्याच्या ठिकाणी पत्रकारांशी संवाद साधून त्या भागातील स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटना, साहित्यीक यांचा पाठींबा घेण्याचा प्रयत्न होणार आहे. दुसर्या टप्प्यात छत्रपती संभाजीनगर येथून यात्रेला सुरूवात होवून बीड, धाराशिव, सोलापूर, पंढरपूर, कोल्हापूर, सातारा, बारामती, पुणे या मार्गे दि.२० ऑगस्ट २०२४ रोजी मुंबई येथे यशवंतराव चव्हाण सेंट्रलमध्ये यात्रेचा समारोप होईल. यात्रेत हजारोंच्या संख्येने पत्रकार, वृत्तपत्र विक्रेते आणि पत्रकारप्रेमी संघटनांचे पदाधिकारी सहभागी होणार आहेत. सरकाने पत्रकारांचा विषय गांभिर्याने घेवून चर्चा करून न्याय देण्याची भूमिका घ्यावी अशी अपेक्षा आहे. यासाठी पत्रकारितेच्या इतिहासात पहिल्यांदाच निघणार्या या संवाद यात्रेत सर्वांनी सहभागी होवून आपल्या एकीच्या शक्तीचे दर्शन सरकारला द्यावे असे आवाहन प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी पत्रकार परिषदेत केले.

मान्यवरांच्या हस्ते पोस्टर प्रकाशन

पत्रकारांच्या विविध न्याय मागण्यांसाठी सर्व पत्रकारांना सोबत घेवून विविध राजकीय पक्ष, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील विचारवंत, नामवंत यांचा पाठींबा घेत नागपूर दिक्षाभूमी ते मंत्रालय मुंबई अशी पत्रकार संवाद यात्रा राज्याच्याच नव्हे तर कदाचित देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच निघणार असल्याने इतिहास घडणार आहे. यावेळी यात्रा पोस्टरचे प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

कै.पत्रकार सुधाकर सोनवणे यांच्या कुटुंबियांना केली आर्थिक मदत

परखड आणि सडेतोड लिखाण करणारे पत्रकार सुधाकर सोनवणे यांचे कर्करोगाने अल्पवयात निधन झाले. त्यांच्या निधनानंतर दोन लहान मुले, पत्नी यांच्यापुढे जगावे कसे? असा मोठा प्रश्न आर्थिक अडचणीमुळे निर्माण झालेला आहे. या कुटुंबीयांना आधार म्हणून पत्रकार संघाच्या वतीने रोख दहा हजार रुपयाची मदत यावेळी करण्यात आली. त्याचबरोबर सोनवणे यांच्या कुटुंबीयांना दानशूरांनी पुढे येऊन मदत करावी असे आवाहन पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे. दानशूरांनी सोनवणे कुटुंबीयांना मदत करण्यासाठी मयत सुधाकर सोनवणे यांच्या धर्मपत्नी तत्त्वशीला सुधाकर सोनवणे यांच्या ९५ ६१ २५ ९२ ६७ या नंबरवर संपर्क साधावा.

### 'लाडक्या बहिणीं'च्या मदतीला

काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांची यंत्रणा कामाला लागली आहे. या योजनेचा जास्तीत जास्त पात्र महिला भगिनींना लाभ मिळवून देण्यासाठी डॉक्टर क्षीरसागर यांच्या यंत्रणेकडून बूथनिहाय विशेष शिबिरे घेतली जात आहेत. ठिकठिकाणी अर्ज भरण्यासाठी महिलांनी गर्दी केली होती. पदाधिकारी, कार्यकर्ते महिलांना अर्ज भरून देत आहेत. त्यामुळे अर्ज स्वतः भरण्याची महिलांची कटकट मिटली असून कागदपत्रेही वेळेत देण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाने दिले आहे. त्यामुळे अर्ज भरण्याची प्रक्रिया गतिमान आणि सोपी होत आहे. योजनेच्या अखेरच्या दिवसापर्यंत अर्ज भरून दिले जाणार आहेत. दरम्यान, महिलांसाठी सुरू केलेली ही योजना लाभदायी ठरणार असून योजना सुरू केल्याबद्दल डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, ना.अजितदादा पवार, कृषी मंत्री ना.धनंजय मुंडे, महिला व बालविकास मंत्री ना.आदितीताई तटकरे यांचे आभार मानले आहेत.

### ऑल इंडिया पारणे इन्सानियत

कार्यकर्ते राजूभाई कुरेशी,शेख जुनेद,हाफेज ऊमेर, अबरारभाई,जहिर सर,मजहर भाई, केंद्रप्रमुख डी.एस. कुलकर्णी,केंद्रीय मुख्याध्यापक टोपे यांची उपस्थित होते.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अशोक लांडगे,उर्दू शाळेचे मुख्याध्यापीका सिद्दिकी कौसरबाजी यांच्यासह सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

### गुरु शिष्य परंपरा हा

शिकवणारे शिक्षक असतात. या तिन्हीही गुरूंना आपण योग्य तो आदर, सन्मान दिला पाहिजे व या सर्व गुरूंनी दिलेले ज्ञान आत्मसात करून ते पुढील पिढीकडे संक्रमित केले पाहिजे तसेच तेवत असलेली संस्कृतीची ज्योत कायम ठेवण्यासाठी गुरु –शिष्य परंपरा चालू ठेवली पाहिजे, असे विचार व्यक्त केले. श्री. जयेंद्र कुलकर्णी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनातील प्रश्न सोडवण्यासाठी पुस्तके व गुरूंचे मार्गदर्शन घेतले पाहिजे. गुरूंची परंपरा आजही भारतीय संस्कृतीत टिकून आहे असे सांगून गुरु –शिष्य परंपरेतील अनेक उदाहरणे त्यांनी यावेळी सांगितली. याप्रसंगी त्यांनी गुरूंचे महत्त्व वर्णन करणारे एक गीत गायले. अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवर्षी म्हणाले की विद्यार्थी आणि गुरु यांचे नाते दीर्घकाळ टिकले पाहिजे तेव्हाच विद्यार्थ्याला योग्य दिशा प्राप्त होऊन तो यशस्वी होऊ शकतो. आई आणि शिक्षक हेच आपले खरे गुरु असतात. त्यांना आपण वंदन केले पाहिजे, असे विचार व्यक्त करून त्यांनी याप्रसंगी स्वामी विवेकानंद– रामकृष्ण परमहंस, अर्जुन –गुरु द्रोणाचार्य, एकलव्य –द्रोणाचार्य, चंद्रगुप्त मौर्य –आर्य चाणक्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर– आंबेडकर गुरुजी व पानसे गुरुजी या आदर्श गुरु शिष्यांच्या जोडींची उदाहरणे याप्रसंगी विद्यार्थ्यांना सांगितली.या कार्यक्रमात कु.शिवकन्या शिंदे,कु. नंदिनी जगताप,कु. प्रीती गंगणे,कु. वैष्णवी पौळ,कु.आरती शिंदे,कु. शामल तिडके कु. कार्तिकी ठवरे आदी विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सौ. अनिता बर्दापूरकर, प्रा. दत्तप्रसाद गोस्वामी,कु. वेदश्री जड व कु.राणी घारुळे यांनी केले तर आभार प्रा. डॉ.अजय डूबे यांनी मानले.

# किसान क्रेडिट कार्डवर अर्थमंत्र्यांची मोठी घोषणा

## आता आणखी पाच राज्यांमधील शेतकऱ्यांना मिळणार कर्ज

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारच्या अर्थसंकल्पाची प्रतीक्षा सर्वांनाच उत्सुकता होती. आज (दि. २३) आर्थिक वर्ष २०२४-२५ साठीचा देशाचा अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केला. या अर्थसंकल्पामध्ये (२०२४) शेतकऱ्यांसाठी अनेक मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी संसदेत अर्थसंकल्प सादर केला.

या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांकडे विशेष लक्ष देण्यात आले असून किसान क्रेडिट कार्डच्या संदर्भात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मोठी घोषणा केली आहे. देशातील आणखी पाच राज्यांमध्ये पीएम किसान कार्ड जारी करण्यात येतील. कृषी क्षेत्राच्या विकासाला सरकारचे पहिले प्राधान्य असल्याचे सांगत त्यांनी नैसर्गिक शेतीसाठी १ कोटी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले.

शेतकऱ्यांसाठी मोठी घोषणा

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मंगळवारी (२३ जुलै) आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी त्यांचा सलग सातवा अर्थसंकल्प सादर केला. किसान क्रेडिट कार्डबाबत अर्थमंत्र्यांनी मोठी घोषणा केली



आहे. सीतारामन म्हणाले की किसान क्रेडिट कार्ड ५ राज्यांमध्ये सुरू केले जाईल. आता किसान क्रेडिट कार्ड सुविधा आणखी ५ राज्यांमध्ये उपलब्ध होणार आहे. त्या म्हणाल्या, कृषी क्षेत्राच्या विकासाला सरकारचे पहिले प्राधान्य आहे. १ कोटी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीसाठी प्रोत्साहन दिले जाईल.

सरकार कोळंबी शेती आणि विपणनासाठी वित्तपुरवठा देखील करेल आणि डाळींचे उत्पादन, साठवण आणि विपणन मजबूत करण्याचे उद्दिष्ट असल्याचे अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना शेतीसंबंधीच्या कामासाठी आर्थिक मदत करणं हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. केसीसीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना बी-बियाणे, खतं, कीटकनाशकं इ. शेतीच्या कामांसाठी कर्ज दिलं जातं. केसीसीसाठी सगळेच शेतकरी अर्ज करू शकतात. यामध्ये स्वत:च्या मालकीची जमीन असणारे, इतरांची जमीन भाडेतत्वावर करणाऱ्या शेतकऱ्यांचा समावेश होतो.

### शेती क्षेत्रासाठी तब्बल १.५२ लाख कोटी रुपयांची तरतूद

सरकारकडून शेती, तसेच शेतीपुरक क्षेत्रासाठी १.५२ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, असे निर्मला सीतारामन म्हणाल्या. नैसर्गिक शेती करण्याला सरकारकडून प्राधान्य दिले जाणार. डाळ आणि तेलबियांच्या उत्पादनात स्वयंपूर्ण होण्यासाठी प्रयत्न केला जाईल.

## हिंगोलीतील कृषी उत्पन्न बाजारसमितीतील मोंढा राहणार ९ दिवस बंद

### हळदीची आवक वाढली



हिंगोली कृषी उत्पन्न बाजार समितीचा मोंढा २५ जुलै ते २ ऑगस्ट या दरम्यानच्या कालावधीत बंद ठेवण्यात येणार असून जवळपास नऊ दिवस मोंढा बंद राहणार असल्याने सोमवारी हळदीची आवक वाढली होती. दरम्यान आज दुपारी एक वाजेपर्यंत हळद स्वीकारली जाणार आहे. काही दिवसांपूर्वी हिंगोली कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतमालाची आवक घटली होती. २२ जुलै सोमवार पासून शेतीमाल भुसार हा सोमवारी, बुधवार, शुक्रवार या प्रमाणात शेड क्रमांक ३ मध्ये उतरविला जात असून २५ जुलै ते २ ऑगस्ट या कालावधीत नऊ दिवस मोंढ्यातील खरेदी- विक्री बंद राहणार आहे. त्यामुळे सोमवार व बुधवार हे दोन दिवस भुसार माल शेतकऱ्यांना विकता येणार नाही.

आज दुपारी १ वाजेपर्यंत हळदीची आवक स्विकारली जाणार

सोमवारी संत नामदेव हळद मार्केटमध्ये १५० वाहनातुन २५०० क्विंटल हळदीची आवक झाली होती. भुसार मार्केटमध्ये ३०० पोते गव्हाला २१०० ते ३००० हजार रुपये दर मिळाला. १५० पोत्यातुन हरभऱ्याला ६ हजार ते ६५०० रुपये दर मिळाला. तर ७०० ते ८०० पोत्यातुन सोयाबीनची आवक झाली. त्याला ४३०० ते ४४५० रुपये भाव मिळाला. हिंगोली कृषी उत्पन्न बाजार समितीमधील भुसार माल विकण्यासाठीचा मोंढा बाजार नऊ दिवस बंद राहणार आहे. त्यामुळे मागील दोन दिवसांपासून हिंगोलीत हळदीची आवक काही प्रमाणात वाढल्याचे दिसून आले.

हळदीला काय मिळतोय भाव?

पणन विभागाने दिलेल्या माहितीनुसार सोमवारी हिंगोलीत ३००० क्विंटल हळदीची आवक झाली होती. तर १२५७ लोकल हळकुंड विक्रीस आणले होते. शेतकऱ्यांना क्विंटल मागे मिळणारा भाव आता घटना असून १७ ते १८ हजार रुपये क्विंटल असणारा भाव आता १४३०० रुपयांवर येऊन थांबला आहे. काही दिवसांपूर्वी हळदीच्या भावात घसरण झाल्याचे दिसून आले. राजापुरी हळदी सह लोकल हळदीचा भावही सात ते आठ हजारांवर घसरल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान, हिंगोलीत आता नऊ दिवस मोंढा बंद राहणार असल्याने हळदीची आवक वाढली असून क्विंटलमागे मिळणाऱ्या भावात काहीशी वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

## मराठवाड्यातील पाणीसाठ्यात किंचित वाढ

संभाजीनगर : मराठवाड्यातील ८७७ प्रकल्पातील एकूण पाने साठ्यात गत आठवड्याच्या तुलनेत किंचित वाढ झाली आहे. गत आठवड्यात १३ टक्क्यांवर असलेला पाणीसाठा १९ जुलै अखेर १५ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. अजूनही अनेक प्रकल्पांची तहान कायम असून त्यासाठी टप्प्याखाली मोठ्या पावसाची आवश्यकता आहे.



मराठवाड्यातील अकरा मोठ्या प्रकल्पात आत्ताच्या घडीला १६ टक्के उपयुक्त पाणीसाठा झाला आहे. दुसरीकडे मध्यम ७५ प्रकल्पात १० टक्के, लघु ७४९ प्रकल्पात ११ टक्के तर गोदावरी नदीवरील १५ बंधाऱ्यात १७ टक्के व तेरणा, मांजरा, रेना नदीवरील २७ बंधाऱ्यात ४६ टक्के उपयुक्त पाणीसाठा झाला आहे. मराठवाड्यातील एकूण ११ मोठ्या प्रकल्पांपैकी तब्बल सात प्रकल्पात २५ टक्क्यापेक्षा कमी, तीन प्रकल्पात २५ ते ५० टक्के तर केवळ एका प्रकल्पात ५० ते ७५ टक्के पाणीसाठा आहे. २५ टक्क्यांपेक्षा कमी पाणीसाठा असलेल्या मोठ्या प्रकल्पात बीड व धाराशिवमधील प्रत्येकी दोन, छत्रपती संभाजीनगर, परभणी, हिंगोलीतील प्रत्येकी एका मोठ्या प्रकल्पाचा समावेश आहे. शिवाय या मोठ्या प्रकल्पांपैकी माजलगाव, मांजरा सीना कोळेगाव हे तीनही प्रकल्प मृतसाठ्यात आहेत. सिद्धेश्वर प्रकल्पात केवळ दोन टक्के उपयुक्त पाणी शिल्लक आहे. सर्वात मोठ्या जायकवाडी प्रकल्पातही चार टक्केच उपयुक्त पाणी असून निम्न दुधनांमध्ये सहा टक्के उपयुक्त पाणी आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगरमधील ११, बीड व धाराशिवमधील प्रत्येकी ९, जालन्यातील ५, लातूरमधील ३ व नांदेडमधील १ मिळून ३८ मध्यम प्रकल्पातील पाणीसाठा जोत्याखाली गेला आहे. याशिवाय ३३१ लघु प्रकल्पांचा पाणीसाठा ही जोत्याखाली गेला आहे. त्यामध्ये लातूरमधील ८४, धाराशिवमधील ७६, बीडमधील ६७, जालन्यातील ३८, छत्रपती संभाजीनगरमधील २७, नांदेडमधील २०, परभणीतील १० व हिंगोलीतील ९ लघु प्रकल्पांचा समावेश आहे. जालना जिल्ह्यातील सात मध्यम प्रकल्पात केवळ तीन टक्के उपयुक्त पाणी शिल्लक असून ५७ लघु प्रकल्पात केवळ एक टक्काच उपयुक्त पाण्याचा साठा शिल्लक आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १६ मध्यम प्रकल्पात चार टक्के तर ९८ लघु प्रकल्पात सात टक्के उपयुक्त पाणी आहे. बीड जिल्ह्यातील १२६ लघु प्रकल्पात सात टक्के तर १६ मध्यम प्रकल्पात १५ टक्के उपयुक्त पाणी आहे. लातूर जिल्ह्यातील आठ मध्यम प्रकल्पात ११ टक्के तर १३४ लघु प्रकल्पात अकरा टक्केच उपयुक्त पाणी आहे. धाराशिव जिल्ह्यातील २०६ लघु प्रकल्पात १९टक्के व १७ मध्यम प्रकल्पात केवळ सात टक्के उपयुक्त पाणी आहे. नांदेड जिल्ह्यातील नऊ मध्यम प्रकल्पात २१ टक्के तर ८० लघु प्रकल्पात १९ टक्के उपयुक्त पाण्याचा साठा आहे. परभणी जिल्ह्यातील २२ लघु प्रकल्पात सहा टक्के तर दोन मध्यम प्रकल्पात ११ टक्के उपयुक्त पाणी आहे. हिंगोली जिल्ह्यातील २७ लघु प्रकल्पात १४ टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगरमधील ११, बीड व धाराशिवमधील प्रत्येकी ९, जालन्यातील ५, लातूरमधील ३ व नांदेडमधील १ मिळून ३८ मध्यम प्रकल्पातील पाणीसाठा जोत्याखाली गेला आहे. याशिवाय ३३१ लघु प्रकल्पांचा पाणीसाठा ही जोत्याखाली गेला आहे. त्यामध्ये लातूरमधील ८४, धाराशिवमधील ७६, बीडमधील ६७, जालन्यातील ३८, छत्रपती संभाजीनगरमधील २७, नांदेडमधील २०, परभणीतील १० व हिंगोलीतील ९ लघु प्रकल्पांचा समावेश आहे.

३ मध्यम आणि ६१ लघु प्रकल्प कोरडे : मराठवाड्यातील ७५ मध्यम प्रकल्पांपैकी जालना, बीड व धाराशिवमधील प्रत्येकी एक प्रकल्प अजूनही कोरडाच आहे. याशिवाय ७५० लघु प्रकल्पांपैकी तब्बल ६१ प्रकल्पात पाण्याचा थेंब नाही. यामध्ये बीडमधील २०, छत्रपती संभाजीनगरमधील १६, जालन्यातील १३, धाराशिवमधील ९ व लातूरमधील तीन लघु प्रकल्पांचा समावेश आहे.

## लिंबूवर्गीय फळांवरील किड आणि उपाय

जून-जुलै महिन्यात पावसाने बागेचा ताण तुटतो झाडाला नवीन पालवी फुटते. या काळात वातावरणातील आर्द्रता व दमट-उष्ण हवामान कीड-रोगांच्या प्रादुर्भावास पोषक ठरते. यामुळे यावर नियंत्रण ठेवावे लागते.


पाने खाणारी अळी : या किडीचा प्रादुर्भाव हा जून व नोव्हेंबर महिन्यात जास्त दिसून येतो. या किडीची पूर्ण वाढलेली अळी गर्द हिरवी असते. ही अळी कोवळी पाने खाऊन प्रादुर्भाव जास्त झाल्यास संपूर्ण पानविरहित दिसते.

पाने पोखरणारी अळी : अळी पानांच्या आतील हरितद्रव्य खाते. पानांवर पारदर्शक, नागमोडी पोखरलेले पांढरे चट्टे दिसतात. अळी आत असल्यामुळे बाहेरून दिसत नाही. पाने आकाराने लहान, चुरगळलेली राहतात. तसेच पाने आखडून सुकतात, गळून पडतात. झाडांची वाढ खुंटते, फूल व फळधारणेवर परिणाम होतो. लहान किंवा मोठ्या झाडांवर नवीन नवतीवर मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होतो.

सिट्रस सायला : ही कीड कोवळे शेंडे, पाने, देठ व कळ्यातील रस शोषून घेत असल्याने शेंडे सुकतात. कळ्या गळून पडतात.

काळी/पांढरी माशी : ही कीड पानातील रस शोषते. त्याच वेळी किडीच्या शरीरातून चिकट द्रव्य स्रवतो. त्यावर काळी बुरशी वाढते. त्यामुळे पाने, फांद्या व फळांच्या वरचा पृष्ठभाग काळा पडतो. यालाच कोळशी रोग पडला असे म्हणतात.

फळातील रस शोषणारे पतंग : रस शोषण करणाऱ्या पतंगासोबतच एरंडीवरील पाने खाणाऱ्या अळीचा पतंगसुद्धा पक्व संत्र्याच्या फळातील रस





शोषण करून फळगळ होण्यास कारणीभूत असते. रस शोषण करणारे पतंग ही पक्व झालेल्या फळावरील एक प्रमुख कीड आहे. प्रौढ पतंग पक्व फळातील रस शोषण करतात. अळ्या इतर जंगली वेलवर्गीय वनस्पतीवर उपजीविका करतात. सायंकाळी अंधार होते त्या वेळी प्रौढ पतंग पक्व फळाला छिद्र करून फळातील रस शोषण करतात. अशा छिद्रामधून जिवाणू आणि बुरशीचा शिरकाव होऊन फळे सडून खाली पडण्यास सुरवात होते. त्यामुळे उत्पादनात फार घट होते. ओफिडेरीस मॉटर्ना या रस शोषणाऱ्या पतंगाचा प्रादुर्भाव संत्रा, मोसंबीवर ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये जास्त दिसून येतो. मराठवाड्यातील मोसंबी व विदर्भातील संत्रा पिकात यामुळे जवळजवळ २५ ते ४० टक्के फळगळ होते.

मावा : ही कीड कोवळ्या पानातील रस शोषण करते. त्यामुळे पाने गुंडाळली जाऊन नंतर सुकतात. जास्त प्रादुर्भाव असल्यास झाडाची वाढ, फुलधारणेवर परिणाम होतो.

साल खाणारी अळी : या किडीची अळी दिवसा फांद्याच्या बेचक्यात छिद्र पाडून लपून बसते. रात्रीच्या वेळी बाहेर पडून खोड, फांद्याची साल खाते. साल खालेल्या जागी जाळीने झाकलेली दिसते. त्यामुळे कोवळ्या फांद्या वाळतात, झाडाची वाढ खुंटते.

किडींमुळे होते फळगळ : रस शोषण करणारे पतंग, फळमाशीच्या प्रादुर्भावामुळे फळगळ दिसून येते. नवीन फूट आल्यावर या किडींचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात सुरू होतो. किडींचा प्रादुर्भाव वाढेपर्यंत थांबण्यापेक्षा नवीन पालवी आल्यानंतर डायमेथोएट १६ मि.लि. किंवा मिथेल डिमेटॉन १२ मि.लि. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

कीड, रोग नियंत्रणाचे उपाय : नवीन पालवीवर प्रामुख्याने सिट्रस सायला व पाने पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव होतो. नियंत्रणासाठी ॲसिफेट २५ ग्रॅम किंवा डायमेथोएट १६ मि.लि. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पावसाळ्यात लिंबू झाडावर खैऱ्या रोगाचा प्रादुर्भाव होतो. नियंत्रणासाठी रोगग्रस्त फांद्यांची छाटणीकरून फांद्या जाळून टाकाव्यात. झाडावर १ ग्रॅम स्ट्रेप्टोमासयीन अधिक ३० ग्रॅम कॉपर ऑक्सिक्लोराईड प्रति १० लिटर पाण्यात मिसळून एक महिन्याच्या अंतराने तीन फवारण्या कराव्यात. बागेत गळालेली फळे एकत्रित करून ती नष्ट करावीत. खोडावर येणाऱ्या इंडरबेला या साल खाणाऱ्या अळीच्या प्रादुर्भावाची दर तीन महिन्यांनी पाहणी करून २० मि.लि. क्लोरपायरिफॉस प्रति १० लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार करावे. या द्रावणात कापसाचा बोळा बुडवून खोडावर जेथे किडीने छिद्र केले आहे तेथे बोळा बसवावा. खोडावर डिंक असलेला भाग खरडून काढावा. तीन ग्रॅम कॉपर ऑक्सिक्लोराईड प्रति लिटर पाण्यात मिसळून हा खरवडलेला भाग धूवून काढावा. प्रत्येक झाडास वर्षातून दोन वेळेस (पावसाळ्यापूर्वी आणि पावसाळ्यानंतर) २५ ग्रॅम कॉपर ऑक्सिक्लोराईड प्रति १० लिटर पाण्यात मिसळून खोडावर ओतावे. बागेमध्ये रस शोषणाऱ्या पतंगांना आकर्षित करण्यासाठी रात्री प्रकाश सापळा लावावा. संध्याकाळच्या वेळी ६ ते ७ दरम्यान बागेत धूर केल्यास पतंग बागेत येत नाहीत. किडीच्या पर्यायी खाद्य वनस्पती गुळवेल, वासनवेल, चांदवेल व एरंडी यांचा नायनाट करावा.




### महत्वाच्या घटना

१५६७ : स्कॉटलंडची राणी मेरी पदच्युत झाल्यामुळे १ वर्षाचा जेम्स (सहावा) स्कॉटलंडच्या राजेपदी विराजमान झाला.
१७०४ : ब्रिटनने जिब्राल्टरचा ताबा घेतला, जो आजपर्यंत सोडलेला नाही.
१८२३ : चिलीमधे गुलामगिरीची प्रथा समाप्त झाली.
१८७० : अमेरिकेमध्ये देशांतर्गत रेल्वे सेवा सुरु करण्यात आली.
१९३१ : पिटसबर्ग, पेनसिल्व्हानिया येथील एका वृद्धाश्रमास आग लागुन ४८ लोक मृत्यूमुखी पडले.
१९३२ : रामकृष्ण मिशन मठाची स्थापना करण्यात आली.
१९४३ : दुसरे महायुद्ध ऑपरेशन गोमोरा दोस्त राष्ट्रांनी जर्मनीतील हॅम्बर्ग शहरावर तुफानी बॉम्बहल्ले सुरू केले. हे हल्ले पुढील आठ दिवस सुरू होते. या हल्ल्यांना हॅम्बर्गचे हिरोशिमा असे म्हणण्यात येते.
१९६९ : सफल मानवी चांद्रमोहिमेनंतर अपोलो ११ हे अंतराळयान पॅसिफिक समुद्रात सुखरूप उतरले.
१९७४ : वॉटरगेट प्रकरण अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला की राष्ट्राध्यक्ष रिर्चड निक्सनने स्वत:विरुद्धचा पुरावा अवैधरीत्या दडवून ठेवला होता.
१९९० : इराकने कुवेतच्या सीमेजवळ सैन्याची जमवाजमव करण्यास सुरूवात केली.
१९९१ : अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी आर्थिक सुधारणांचा पाया घालणारा? अर्थसंकल्प संसदेत सादर केला.
१९९७ : ख्यातनाम बंगाली लेखिका महाश्वेतादेवी यांना पत्रकारिता, साहित्य व कला या क्षेत्रातील कामगिरीसाठी 'रॅमन मॅगसेसे पुरस्कार' जाहीर
१९९७ : माजी हंगामी पंतप्रधान गुलझारीलाल नंदा आणि स्वातंत्र्यसैनिक अरुणा असफ अली यांना स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात सर्वोच्च नागरी सन्मान भारतरत्न प्रदान
१९९८ : परकीय चलन नियमन कायद्याच्या जागी परकीय चलन व्यवस्थापन कायदा जारी करण्याचा केंद्रीय मंत्रीमंडळाचा निर्णय
२००० : विप्रो आंतरराष्ट्रीय बुध्दिबळ स्पर्धेत चेन्नईच्या विजयालक्ष्मी सुब्रह्यण्यम हिने भारताच्याच पी. हरिकृष्णला बरोबरीत रोखल्यामुळे तिला अर्धा गुण मिळाला त्यामुळे तिच्या ग्रँडमास्टर या किताबावर शिक्कामोर्तब झाले व ती भारताची पहिला महिला ग्रँडमास्टर बनली.
२००१ : जपानमधील टोकियो येथे झालेल्या जागतिक जलतरण स्पर्धेत भारताच्या शिखा टंडनने फ्रीस्टाईल प्रकारात १०० मीटर अंतर ५९.९६ सेकंदात पार केले. ही शर्यत एक मिनिटापेक्षा कमी वेळात पूर्ण करणारी ती भारताची सर्वात लहान खेळाडू आहे.
२००४ : इटली देशाने भारतीय पर्यटकांसाठी सात नवीन वीजा कॉल सेंटर सुरु करण्याचा निर्णय घेतला.
२००५ : लान्स आर्मस्ट्राँगने 'टूर-डी-फ्रान्स' ही सायकल शर्यत सलग सातव्यांदा जिंकली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७८६ : फ्रेंच गणितज्ञ संशोधक जोसेफ निकोलेट यांचा जन्म.
१८०२ : फ्रेंच लेखक अलेक्झांड्रे ड्युमास यांचा जन्मदिन.
१८५१ : जर्मन गणितज्ञ फ्रेडरिक शॉटकी यांचा जन्म.
१९११ : गोविंदभाई श्रॉफ हैदराबाद मुक्तिसंग्रामातील झुंजार स्वातंत्र्य सेनानी (मृत्यू:)
१९११ : अमल ज्योती तथा 'पन्नालाल' घोष बासरीवादक व संगीतकार (मृत्यू: २० एप्रिल १९६०)
१९२४ : प्रसिद्ध भारतीय गजल गायक व उर्दू शायर(कवी) नाज़िश प्रतापगढ़ी यांचा जन्मदिन.
१९२८ : केशुभाई पटेल गुजरातचे मुख्यमंत्री आणि राज्यसभा सदस्य
१९३७ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते आणि पटकथालेखक मनोज कुमार यांचा जन्म.
१९४५ : अझीम प्रेमजी दानशूर व्यक्ति आणि 'विप्रो'चे चेअरमन
१९४७ : जहीर अब्बास पाकिस्तानी फलंदाज
१९६९ : जेनिफर लोपेझ अमेरिकन अभिनेत्री, गायिका आणि नर्तिका
१९८५ : पद्मश्री, पद्मभूषण, राजीव गांधी खेलरत्न, पुरस्कार विजेता उत्कृष्ट भारतीय बिलियर्ड्स आणि स्नूकर खेळाडू पंकज अडवाणी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

११२९ : शिराकावा जपानी सम्राट (जन्म: ७ जुलै १०५३)
१९७० : भारतीय उद्योगपती पीटर दि नरोन्हा यांचे निधन. (जन्म: १९ एप्रिल १८९७)
१९७४ : सर जेम्स चॅडविक अणूमधील न्यूट्रॉनच्या शोधाबद्दल १९३५ मधे नोबेल पारितोषिक मिळालेले ब्रिटिश पदार्थवैज्ञानिक (जन्म: २० आक्टोबर १८९१)
१९८० : अरुण कुमार चटर्जी तथा 'उत्तम कुमार' बंगाली व हिन्दी चित्रपट अभिनेते (जन्म: ३ सप्टेंबर १९२७)
१९८० : पीटर सेलर्स इंग्लिश विनोदी अभिनेता आणि गायक (जन्म: ८ सप्टेंबर १९२५)
२०१२ : सीटी स्कॅन चे शोधक रॉबर्ट लिडले यांचे निधन. (जन्म: २८ जुन १९२६)
२०१८ : माजी ब्रिटीश अष्टपैलू क्रिकेटपटू जॉन मुरै यांचे निधन.

# सोनीमोहा येथे कागदोपत्री तयार केली अनाधिकृत शालेय व्यवस्थापन समिती

## सेवानिवृत्त होणाऱ्या मुख्याध्यापक व माजी अध्यक्षाचा प्रताप

बीड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील जि.प.प्राथमिक शाळा सोनीगोहा येथील शालेय व्यवस्थापन समितीची मुदत ही दि. १० फेबुवारी २०२४ ला कार्यकाळ संपाला आहे. त्यानंतर नवीन शालेय व्यवस्थापन समिती स्थापन करण्यासाठी पालकांनी व ग्रामस्थांनी अर्ज दिलेला असताना देखील तत्कालीन सेवानिवृत्त होणारे मुख्याध्यापक माणिक गणपतराव मुंडे व तत्कालीन शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष यांनी कसल्याही प्रकारची बैठक अथवा पालकांना सुचना पत्र न देता गावातील कोणत्याही पालकांना विश्वासात न घेता व त्यांना मतदानापासून वंचित ठेवून कागदोपत्री अनाधिकृत शालेय व्यवस्थान समिती पूर्वीच्याच लोकांना नाव बदल करून निवड करण्यात आलेली आहे. हा प्रताप सेवानिवृत्त होणारे मुख्याध्यापक व तत्कालीन शालेय समितीचे अध्यक्ष यांनी केला आहे, लोकशाही ला काळीमा फासणाचे काम करण्यात आले आहे.

ही शालेय व्यवस्थापन समिती कोणत्याही पालकांना मान्य नसल्यामुळे ही रद्द करून सर्व पालकांची पालक बैठक बोलावून चर्चा विचार विनीमय करून सर्व पालकांसमक्ष नविन शालेय व्यवस्थापन समितीची निवड करण्यात यावी अन्यथा सर्व पालक शाळेसमोर उपोषणास बसणार आहोत तरी अनाधिकृत स्थापन केलेली शालेय व्यवस्थापन समिती रद्द करण्याची मागणी शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्या कडे सोनीमोहा येथील ग्रामस्थ व पालक प्रकाश अभिमान दराडे, मेघराज बालासाहेब मुंडे, राहुल विष्णू तोंडे, अशोक साहेबराव दराडे ,अमोल वैजनाथ तोंडे,कपिल संजय सुरवसे,नवनाथ तोंडे,उमेश गोवर्धन तोंडे,संजय श्रीराम भोसले,सतीश चिंतामण तोंडे ,राजेश बाबासाहेब अडागळे ,यांच्या सह असंख्य पालक व सोनीमोहा ग्रामस्थांनी केली आहे.



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोनिमोहा येथे गेल्या चार महिन्यांपासून मुख्याध्यापक पद रिक्त असून पदाचा मुख्याध्यापक नसल्यामुळे विद्यार्थ्यांना शालेय कामकाजात अडचण येत असून मुख्याध्यापक पद त्वरित भरण्यात यावे अशीही मागणी पालकांनी शिक्षणाधिकारी बीड यांच्या कडे केली आहे.

सदरील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोनिमोहा येथील शालेय व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन करताना तत्कालिन मुख्याध्यापक व त्यावेळेस चे शा.व्य. स अध्यक्ष यांच्या मध्ये आर्थिक व्यवहार झाल्याचा वास येत असल्याचे येथील पालकांनी सांगितले आहे, तात्काळ अनाधिकृत तयार करण्यात आलेली शालेय व्यवस्थापन समिती रद्द करून कार्यवाही करण्यात यावी अन्यथा शाळेसमोर उपोषणास बसण्याचा इशारा पालकांनी शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद बीड यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

## आदर्श शिक्षक पुरस्काराने अनिल भालेकर सन्मानित



अंबड । प्रतिनिधी

अहमदनगर येथील ध्येय उद्योग समूहाच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल जामखेड येथील आदर्श इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत शिक्षक अनिल विनायकराव भालेकर यांना राज्यस्तरीय ध्येय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४ ने समारंभपूर्वक सन्मानित करण्यात आले. विद्यार्थी प्रिय असणारे शिक्षक म्हणून ओळख असणारे अनिल भालेकर आपल्या शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना सर्वगुण संपन्न बनवण्यासाठी सदैव कार्यतत्पर असतात.कला, संस्कृती, क्रीडा, वकृत्व, विज्ञान क्षेत्रात उत्तम कामगिरी करण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असतात. त्यांच्या मार्गदर्शनानुसार तयार झालेले विद्यार्थी तालुका,जिल्हा,राज्य पातळीवर विजय ठरलेले आहेत.

जुन्या चालीरीती,रीती रिवाज, परंपरा व लोककलेवर आधारित त्यांचे लिखाण नेहमी लक्षवेधी ठरते. गोंधळी, बहुरूपी,पारंपरिक व्यवसाय करणार मेंढपाळ बांधव यांची वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती, इतिहास समस्या याबाबतचे त्यांचे विशेष लेख वाचकांना विशेष पसंतीस उतरत असतात. विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्य रुजवण्यासाठी विविध उपक्रमाचे ते वेळोवेळी आयोजन करत असतात. लेझीम कला प्रकारात ते विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षण देण्याबरोबरच मैदानी खेळामध्ये विद्यार्थ्यांना तांत्रिक प्रशिक्षण देत विद्यार्थ्यांमध्ये आत्मबळ विकास होण्यासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन करत असतात. यापूर्वी देखील शैक्षणिक, सामाजिक,पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल राज्य पातळीवरील व राष्ट्रीय पातळीवरील अनेक पुरस्काराने ते सन्मानित झालेले आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. या समारंभ प्रसंगी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व लखनऊचे माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे, उद्योजक नितीन एडके, ध्येय उद्योग समूहाचे अध्यक्ष लहानु सदगीर यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देत अनिल भालेकर यांचा गौरव करण्यात आला. राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित झाल्याबद्दल अनिल भालेकर यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक केले जात आहे. तसेच हा पुरस्कार सर्व विद्यार्थ्यांना त्यांनी समर्पित केला आहे.

## थोडक्यात

### वसंतदादा पाटील महाविद्यालयात टिळक जयंती

पाटोदा – येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २३ जुलै रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. त्यांच्या हस्ते लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाला अर्पण करण्यात आली. व्यासपीठावर उपप्राचार्य प्रोफेसर सतिष माउलगे, प्रशांत पाटील, प्रा. मनिषा गाढवे, डॉ. अशोक नागरगोजे, डॉ. सोमनाथ लांडगे, प्रा. रवि जोगदंड उपस्थित होते. प्रशांत पाटील यांनी लोकमान्य टिळकांच्या सामाजिक, शैक्षणिक व स्वातंत्र्य चळवळीतील राजकीय कार्यावर सविस्तर भाष्य केले. सूत्रसंचालन प्रा. मनिषा गाढवे यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. अशोक नागरगोजे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### तुलसी महाविद्यालयात टिळक जयंती

बीड(प्रतिनिधी): येथील देवगिरी प्रतिष्ठान बीड संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान बीड येथे मंगळवार दिनांक २३ जुलै रोजी सकाळी ११ वाजता लोकमान्य टिळक जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.एम.थोरात यांनी लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले याप्रसंगी उपप्राचार्य डी.जी.निकाळजे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,कर्मचारी उपस्थित होते.

### केएसपी विद्यालयात टिळक जयंती

बीड : शहरातील कालिका नगर भागातील के.एस.पी.( कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले)विद्यालय,बीड येथे मोठ्या उत्साहात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ऋषिकेश शेळके म्हणाले की, लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी सार्वजनिक कार्यात सक्रिय सहभाग घेतला. ते म्हणायचे: ''धर्म आणि व्यावहारिक जीवन वेगळे नाही. केवळ स्वतःसाठी काम न करता देशाला आपले कुटुंब बनवणे हाच खरा आत्मा आहे. पुढची पायरी म्हणजे मानवतेची सेवा करणे आणि त्याही पुढची पायरी म्हणजे देवाची सेवा करणे. तसेच त्यांच्या प्रारंभिक जीवन चरित्रा विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थिती ऋषिकेशजी शेळके, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग तसेच कार्यक्रमाचे मार्गदर्शक संस्थाध्यक्षा अंजली शेळके, प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्याच्या उपस्थितीत लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती साजरी करण्यात आली.

# बाल विवाह निर्मूलन मोहिमे अंतर्गत पाली येथे कार्यक्रम



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात बाल विवाह निर्मूलन मोहिमे अंतर्गत बाल विवाह थांबविण्यासाठी विविध जन जागरूती पूर्ण कार्यक्रम केले जात आहे. याचा अंतर्गत पाली येथील जिल्हा परिषदेच्या माध्यामिक विद्यालयात बाल विवाह निर्मुलनपर जनजागृती कार्यक्रम आयोजित केला गेला.हा कार्यक्रम शनिवारी जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय व युवराज शंभुराजे सेवाभावी संस्था बीड यांच्या संयुक्तपणे जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालय , पाली येथे आयोजित करण्यात आला होता.

आयोजित केलेल्या कार्यक्रमात बाल विवाह कायद्याने गुन्हा आहे. बाल विवाहाचे आयोजन करणे, साखरपुडा करणे, लग्नाची बोलणी करणे, किंवा बाल विवाहाला प्रोत्साहन भेटल अशी कोणतेही कृती करणे याकरिता वधु व वर यांचे आई वडील, मामा मामी, इतर नातेवाईक भटजी, मंडपवाले, सजावटवाले, फोटो ग्राफर, पाणीवाले, आचारी, व-हाडी मंडळी या सर्वावर बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ मधील कलम ९, १०,११ मधील तरतूदी प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात येतो. बालविवाह विषयी गुपित माहिती देण्यासाठी चाईल्ड हेल्पलाईन (१०९८) क्रमांकाचा उपयोग करावा, अशी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, बाल संगोपन योजना, अनाथ मुलांसाठी प्रमाणपत्र, लेक लाडकी योजना या सर्व योजनांचे स्वरूप, या योजनांसाठी कोण पात्र किंवा अपात्र आहेत, योजनांसाठी लागणारे कागदपत्रे, अर्ज भरण्याची प्रक्रिया संदर्भात विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले. सर्व गरजू मुला मुलींनी आणि त्यांच्या कुटुंबानी या योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले.यावेळी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, मंगेश जाधव, जिल्हा समन्वयक चाईल्ड हेल्पलाईन(१०९८) अश्विनी जगताप, सुपरवायझर प्रसाद पवार, सुपरवायझर प्रवीण वीर, स्वयंसेवक स्वप्नील कोकाटे तसेच जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालय, पाली येथील मुख्याध्यापक लाड.के.एस यांनी आणि शिक्षक मुंडे. एम. एस, राठोड.आर.एम, आघव.आर.डी, म्हेत्रे.आर.एस कार्यक्रमाच्या वेळी उपस्थित होते.

## उल्लेखनीय कार्याबद्दल प्रा. पटेल यांचा सत्कार



बीड । प्रतिनिधी

गुरुपौर्णिमेनिमित्त ''संस्कार भारतीच्या वतीने शिक्षण क्षेत्रात तथा पत्रकारितेत ३५ वर्ष स्पृहणीय काम केल्याबद्दल प्रा.सी.आर.पटेल यांचा आज त्यांच्या निवासस्थानी सत्कार करण्यात आला.

सत्कार करताना सन्मान पत्राचे वाचन व गुलाब पुष्प देऊन गुरुजनांनी हा सन्मान स्वीकारला. प्रा.सी.आर.पटेल आपल्या ३५ वर्षाच्या सेवेनंतर २०१४ साली सेवानिवृत्त झाले. त्यांचे अनेक विद्यार्थी आज भारतात व भारताबाहेर उच्च पदावर कार्यरत आहेत. शिक्षकाच्या कार्याची हीच खरी पावती आहे. संस्कार भारती वेगवेगळ्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा दरवर्षी ''गुरुपौर्णिमेला'' सत्कार करते. अशाच प्रकारे यावेळी सेवानिवृत्त ज्येष्ठ प्राध्यापक तथा पत्रकार सी.आर.पटेल यांचा यावेळी गुरुपौर्णिमेनिमित्ताने सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या निवासस्थानी घेण्यात आलेल्या एका छोटेखानी कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रमोद वझे यांनी केले तर गणेश तालखेडकर यांनी सन्मानपत्राचे वाचन केले. यावेळी संस्कार भारतीचे देवगिरी प्रांताचे पूर्वअध्यक्ष भारत अण्णा लोळगे, जिल्हाध्यक्ष प्रमोद वझे, वासुदेव निलंगेकर, महेश वाघमारे, संतोष पारगावकर, लक्ष्मीकांत सौंदतीकर, अनिल कुलकर्णी, गणेश तालखेडकर, लक्ष्मीकांत खडकीकर, सुरेश साळूंके, केदार बहिरमल, गणेश स्वामी, अशोक कुलकर्णी, अंनत सुतनासे, जगदीश जाधव, महेश देशमुख व दत्ता घोडके यांची प्रमुख उपस्थिती होती.

## विशाळगडाच्या पायथ्याशी झालेल्या हल्ल्याची उच्चस्तरीय चौकशी करा



पाटोदा / प्रतिनिधी

विशाळगड, गजापुरात हल्ला करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी महाविकास आघाडी व घटक पक्षाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या वतीने उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे करण्यात आली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की विशाळ गडावरील अतिक्रमण काढण्याच्या नावाखाली विशाळ गडाच्या पायथ्याशी असलेल्या मुसलमान वस्ती , गजापूर याठिकाणी मुस्लीम समाजाच्या घरावर धार्मिक स्थळावर तसेच महिला पुरुषावर झालेल्या हल्ल्याचे आम्ही सर्व महाविकास आघाडी पदाधिकारी कार्यकर्ते ता. पाटोदा हे वरील घटनेचा निषेध नोंदवत झालेल्या प्रकारची न्यायालयीन चौकशी होऊन दोषीवर कार्यवाही व्हावी तसेच वरील प्रकार घडल्यास शासनाच्या पोलीस व प्रशासनाचा हलगर्जीपणा यास कारणीभूत असून , येणाऱ्या विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन हे षडयंत्र हिंदू – मुस्लीम दंगे घडवून मत विभागणीसाठी व आपल्या पक्षाला फायदा मिळवण्यासाठी व सत्ता टिकवून ठेवण्यसाठी हेतू पूर्वक केला आहे काय अशी शंका निर्माण होते . यासाठी वरील झालेल्या घटनेची निरपेक्षपणे न्यायालयीन चौकशी होणे गरजेचे आहे या निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार ता.अध्यक्ष शिवभुषण जाधव,भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कॉ.महादेव नागरगोजे, राष्ट्रीय कॉंग्रेसचे ता.अध्यक्ष राहुल जाधव, शेकापचे भाई विष्णुपंत घोलप,शिवसेना(उबाठा)अंजिक्य डोरले,रविकुमार नारायणकर,अँड.बाबुराव नाईकनवरे, शेख मोबीन हमीद आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## शालेय समिती अध्यक्षपदी जाधव तर उपाध्यक्षपदी कडूकर



मंठा । प्रतिनिधी

उमरखेडा ता.मंठा येथील जिल्हा परिषद शाळेची शालेय समितीची निवड झाली काल (ता.२३) मंगळवार रोजी करण्यात आली या वेळी शालेय समितीचे अध्यक्षपदी प्रसाद जाधव याची तर उपाध्यक्षपदी गजानन कडूकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली.तर सदस्यपदी सो. शारदा गुलाब डोंबे,सो.ज्योती गजानन जाधव, सो.प्रभा दत्ता सांगोळे,संतोष वाघ,गजानन शिंदे,विष्णु पंढरे, सो.जया विकास जाधव,सो.मनाली विशाल जाधव यांची निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. या प्रसंगी उमरखेडा सरपंच आनंद जाधव,उपसरपंच प्रतापराव जाधव यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष उपाध्यक्ष व सदस्यांचा पुष्पहार घालून सत्कार केला.या वेळी रामभाऊ जाधव,रवींद्र राठोड,गंगाधर शिंदे,सावता विधाते,गजानन डोंबे,रामेश्वर धारकर,धोंडीबा मस्के, अशोक पंढरी,दौलत जाधव,नारायण डोंबे,शाळेचे मुख्याध्यापक श्री गोंदडवाड, श्री राठोड,श्री वायाळ यांची उपस्थिती होती.

# ऑल इंडिया पँथर सेनेचा माजलगाव तहसीलवर धडक मोर्चा

## बीड जिल्हा दलित अत्याचार घोषित करा




पाटोदा / प्रतिनिधी

भूमिहीन दलित शेतमजूर महिलांना झालेल्या मारहाण प्रकरणातील आरोपींना अटक झाली पाहिजे माजलगाव तालुक्यातील राजेगाव येथील महिलांना मारहाण व विनयभंग करून त्यांच्यावर अन्याय केला आहे माजलगाव बीड महाराष्ट्रातील घटनांबाबत व मूलभूत प्रश्नांबाबत निवेदन माजलगाव तहसीलदार यांना राजेगाव पिडीतांना न्याय मिळाला पाहिजे आरोपींना अटक झाली पाहिजे पिडीतांना पोलीस संरक्षण द्यावे. या साठी तहसील कार्यालय माजलगाव येथे मोर्चा काढुन तहसील समोर भाषणे झाले. भाषणा मध्ये ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक भाई केदार म्हटले दलित अत्याचार ही राष्ट्रीय संपत्ती घोषीत करा. नैतिकतेच्या आधारावर ग्रहमंत्र्यांनी सर्व प्रकरणांना न्याय द्या अन्यथा पदाचा राजीनामा द्या.

अन्यथा चार दिवसा नंतर ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने बीड सोलापूर नेशनल हायवे वर रस्ता रोको आंदोलन केले जाईल. दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेअंतर्गत या महिलांना जिल्हा व तालुक्यातील भूमिहीन दलितांना तात्काळ जमीन द्यावी अल्पवयीन १४ वर्षीय कोल्हाटी समाजाच्या गरीब मुलीवर माजलगाव येथील लॉजवर बलात्काराची घटना गंभीर आहे बेकायदेशीर लॉजिंग बंद करावी आरोपींनवर कठोर कारवाई करून सदरील मुलीला शिक्षण व नोकरीची तरतूद करून तिचे पुनर्वसन करावे. विशाळगड दंगलीतील दंगलखोरांना अटक झाली पाहिजे नुकसान झालेल्या ग्रामस्थांचे नुकसान भरपाई देण्यात यावी आरोपीवर युएपीए अॅक्ट अंतर्गत कारवाई करावी महाराष्ट्रात दलित हत्याकांड अत्याचार वाढले आहेत सातारा,येवला,लातूर, सांगोला बीड,अमरावती राज्यभर अत्याचार वाढत आहेत तात्काळ महाराष्ट्र दलित अत्याचार ग्रस्त घोषित करावा ६० वर्षापासून करचुंडी येथील बौद्ध बांधव गायरान जमीन नावावर करण्यासाठी लढत आहेत तात्काळ त्यांना न्याय द्यावा फिलोसिफ,स्वाधार घरकुल योजनेचा सामाजिक न्यायचा निधी इतरत्र वळू नये ती सरसकट द्यावी आजच्या तारखेपर्यंत ताब्यात असलेल्या गायरान जमिनीचे सातबारे देण्यात यावेत. अशा आशयाचे निवेदन माजलगाव तहसीलदार यांच्यामार्फत गृहमंत्री सामाजिक न्याय मंत्री यांना देण्यात आले. या धडक मोर्चा ला ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक भाई केदार, विनोद भोळे, अशोक घडवे पाटील,जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे,भीमराव कदम, प्रल्हाद डावरे, मच्छिंद्र पायके, वसीम शेख, मीणाताई लोंढे,अविनाश वाघमारे, सूर्यकांत ठोकळ, विनोद कोरडे, बादल तरकसे, त्रिंबक पायके,व संघटनेतील कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.



## जाहीर प्रगटन

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६०५/२०२४**

CNRN0.MHBI0200011082024

**मुक्ताबाई बापुराव जाधव वि. निरंक (मार्फत अॅड कुलकर्णी जी एस.)**

अर्जदार –१. मुक्ताबाई स. बापुराव जाधव, वय ७० वर्ष, धदा घरकाम, २. प्रकाश पि. बापुराव जाधव, वय ४८ वर्षे, धदा मजुरी ३. विक्रम पि. बापुराव जाधव, वय ४७ वर्ष, धंदा मजुरी ४. आयोध्या भ्र. बापुराव जाधव, वय ४२ वर्षे, धंदा–मजुरी सर्व. रा. नरसोबा नगर, बीड ता.जि. बीड

विरुध्द: निरंक मागणी अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत बापुराव दादाराव जाधव यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत बापुराव दादाराव जाधव यांचा मृत्यु दिनांक ३०/०९/२०२२ रोजी राहते नरसोबा नगर, बीड ता.जि.बीड त्यांचा मृत्यु झाला आहे. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र.२ व ३ हे मयताची मुले आहेत व अर्जदार क्र. ४ हि मयताची मुलगी आहे. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयत बापुराव दादाराव जाधव यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कात त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**प्रकरणातील पुढील तारीख २१/०८/२०२४ आज दिनाक २० माहे जुलै २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

स्वाक्षरित
क. लिपीक.

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

# बलात्कारीत मुलीसह आई,भावास अतिथी लॉजच्या मालकांकडून मारहाण

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील अतिथी लॉजचे मालक ओंकार खुर्पे,चंदु खूर्पे व इतरांनी मिळून एका १४ वर्षीय बलत्कारीत मुलीसह तीची आई व भावाला मारहाण केल्याचा प्रकार अतिथी लॉजवर घडला असुन याप्रकरणी माजलगाव शहल पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




यासंदर्भात पोलिस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार गेल्या कांही दिवसापूर्वी शहरातील अतिथी लॉजवर एका १४ वर्षीय मुलीला नेऊन अत्याचार झाल्याची घटना घडली होती त्यावर लॉज चालकांच्या विरोधात शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती.परंतु पोलिसांकडून लॉजचं कुठलंही परीक्षण झालेलं नाही अथवा लॉज चालकांची चौकशीही झालेली नसल्याचं बोललं जात आहे. दिनांक २२ जुलै सोमवार रोजी सायंकाळी ८:४५ ते ९;०० वाजण्याच्या सुमारास पिडीत मुलगी तीची आई, भाऊ अन्? आईचा मामा हे खरेदी करून गावाकडे अतिथी लॉज जवळून जात असतांना अतिथी लॉजचे मालक ओंकार खुर्पे व चंदु खूर्पे यांच्या सह इतर दोन ते तिन जणांनी रस्त्यात अडवुन आमच्या विरोधात दिलेली तक्रार मागे घे म्हणत शिवीगाळ करत चापटा बुक्याने मारहाण केली व मुक्कामार देवून जिवे मारण्याची धमकी दिली असल्याचे पिडीत मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून ओंकार खुर्पे,चंदु खुर्पे व इतर दोन ते तीन जणांविरोधात भारतीय दंड संहिता बी.एन.एस./२०२३ कलम ११५,३५१ ( २ ),३५२,३ ( ५ ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पदोन्नतीसाठी जिल्हा परिषदेसमोर आज उपोषण

माजलगाव । प्रतिनिधीं

पदोन्नती संघर्ष समन्वय समितीच्या वतीने जि प बीड समोर शिक्षकांच्या विविध मागण्यासाठी आज दि २४ जुलै २०२४ सकाळी १० :०० वा आमरण उपोषणाला बसणार आहेत .

याबाबत अधिक माहिती अशी की, जि.प.बीड ने शिक्षकांच्या पदोन्नत्या अनेक वर्षा पासून केलेल्या नाहीत त्यामुळे अनेक पदे रिक्त आहेत.पदोन्नती न केल्याने शिक्षक , प्राथमिक पदविधर , केंद्रप्रमुख ग्रेड मुख्याध्यापक व शिक्षण विस्तार अधिकारी यांची एक हजार पेक्षा जास्त पदे जिल्ह्यातील रिक्त आहेत.त्या कारणाने गोरगरीब मुलांना शाळेत शिकवण्यासाठी अनेक शाळांमध्ये शिक्षक उपलब्ध नाहीत.शिक्षकांना केंद्रप्रमख मुख्याध्यापक व शिक्षणविस्तार अधिकारी यांचे अतिरिक्त काम देण्यात आले आहेत.त्यामुळे शाळेत शिक्षक मुलांना शिकवण्यासाठी उपलब्ध नाहीत तसेच पदोन्नती शिवाय शिक्षकांना विहीत कालावधी नंतर देण्यात येणारा चटोपाध्याय व निवडश्रेणी प्रस्ताव पाच वर्षापासून प्रलंबित आहेत . वैद्यकीय प्रतिपुर्ती देयके दरमहा मंजूर करण्यात यावीत अशा विविध विषयांच्या मागण्या मान्य करा कराव्यात यासाठी अनेक संघटनानी व पदोन्नती समन्वय समिती ने निवेदने दिली आहेत.परंतु जि प बीड चे अधिकारी व कर्मचारी यांनी मागण्या पूर्ण केल्या नाहीत.त्या कारणाने जि प बीड समोर समन्वय समिती सोबतच महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ बीड , कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघ महाराष्ट्र राज्य , महाराष्ट्र राज्य शिक्षक समिती बीड,अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ जिल्हा बीड,महाराष्ट्र राज्य केंद्रप्रमुख संघ जिल्हा बीड या सर्व शिक्षक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते व पदोन्नतीपात्र शिक्षक बंधू भगिनी आमरण उपोषण करत आहेत.तरी बीड जिल्ह्यातील इतर कर्मचारी संघटनांनी ही उपोषणास जाहिर पाठिंबा दिला आहे.तरी सर्व शिक्षक बांधवांनी आमरण उपोषण करणाऱ्या बांधवांना प्रेरणा देण्यासाठी उपोषणाला जाहिर पाठिंबा म्हणून उपोषण स्थळी हजर राहावे असे आवाहन शिक्षक पदोन्नती संघर्ष समन्वय समिती जिल्हा बीड ने केले आहे .

# अजितदादा पवार, धनंजय मुंडे यांचा जन्मदिन शैक्षणिक सप्ताह म्हणून केला साजरा

परळी । प्रतिनिधी

परळी येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक नेते प्रणव परळीकर यांनी स्वखर्चातून राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार तसेच कृषिमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शैक्षणिक सप्ताह साजरा करत परळी शहरातील विविध शाळांमध्ये गटनेते वाल्मिक अण्णा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना तब्बल १० हजार वह्यांचे मोफत वाटप केले आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रणव परळीकर यांचा अभिनव उपक्रम; परळीतील विविध शाळांमध्ये १० हजार वह्यांचे मोफत वाटप

शहरातील वैद्यनाथ विद्यालय,श्रीमती कृष्णाबाई देशमुख विद्यालय, मिलींद विद्यालय, श्री सरस्वती विद्यालय या शाळेत वाटप करण्यात आले व इतर शाळेत वाटप करण्यास उद्यापासून सुरूच असणार आहेत.या अभिनव उपक्रमाची सुरुवात शाळेत विद्यार्थ्यांना मोफत वह्या देऊन करण्यात आली. यावेळी तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, माजी नगराध्यक्ष दिपक देशमुख,माजी उपनगराध्यक्ष सुरेश टाक, रविंद्र परदेशी, सरचिटणीस अनंत इंगळे, माजी नगरसेवक अजिज कच्छी, जालिन्दर नाईकवाडे, राजेंद्र सोनी, महेंद्र रोडे, लालाखान पठाण,संजय देवकर, रामेश्वर कोकाटे, बळीराम नागरगोजे, मधुर ढाकणे, बालाजी घोडके, लखन ठाकुर, चंद्रप्रकाश हालगे वैद्यनाथ विद्यालयाचे हरिश देशमुख, अजय जोशी सर, पापा देशमुख, मिथुन रोडे, कृष्णाबाई देशमुख विद्यालयाचे एस. पी. शिंदे, कदम सर, मिलिंद विद्यालयाचे बी जी कदरकर, शौकत पठाण, प्रा. शिल्पा मुंडे, राठोड सर, सरस्वती शाळेचे मिसाळ सर,रवि गुळभिले, जगन्नाथ वडुळकर, वैभव दहिफळे आदी उपस्थित होते.

# शिवसैनिक जिद्दीला पेटला तर विजय मिळाल्याशिवाय राहत नाही –उद्धव ठाकरे

**मंठा । प्रतिनिधी**

मला अंध भक्त नकोय ; डोळे उघडे ठेवणारे मतदार पाहिजेत असे सांगून शिवसैनिक एकदा जिद्दीला पेटला तर विजय मिळाल्याशिवाय राहत नाही. असा विश्वास शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला. श्री ठाकरे यांनी आज मंगळवार ता. २३ रोजी राज्यातील सर्व जिल्हाप्रमुख आणि पदाधिकाऱ्यांसोबत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधला. मंठा येथे शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात जिल्हाप्रमुख तथा सभापती ए जे बोराडे, उपजिल्हाप्रमुख माधवराव कदम,




परतुर विधानसभा समन्वयक अशोक आघाव, माजी सभापती संतोष वरकड, मंठा तालुकाप्रमुख अजय अवचार, परतुर तालुकाप्रमुख सुदर्शन सोळंके, शहरप्रमुख वैजनाथ बोराडे, तालुका संघटक तुळशीराम कोहीरे, शहर संघटक पप्पू दायमा यांची उपस्थिती होती. यावेळी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी निवडणुकीमध्ये आपण पुढे आहोत अशा भ्रमात राहू नका. २५ जुलै ते नऊ ऑगस्ट या कालावधीत विधानसभेचे विजयाची मुहूर्तमेढ रोवली पाहिजे. अशा सूचना देऊन या कालावधीत जास्तीत जास्त मशाल चिन्हाचा प्रचार झाला पाहिजे तसेच नवीन मतदार नोंदणी दुबार मतदारांची नावे कमी करणे यासह मोठ्या प्रमाणावर शिवसेना सदस्य नोंदणी करावी असा आदेश दिला. ४ ऑगस्ट ते ११ ऑगस्ट हा भगवा सप्ताह राबविण्यासाठी सर्कलनिहाय कार्यक्रमाचे नियोजन करावे, या कालावधीमध्ये पंचायत समिती गणनिहाय बैठकीचे आयोजन करून जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करण्याला प्राधान्य द्यावे असे आवाहन केले. मला अंध भक्त नकोय तर डोळे उघडे ठेवणारे मतदार व कार्यकर्ते पाहिजेत कारण शिवसैनिक जिद्दीला पेटला तर विधान परिषदेवर भगवा फडकल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास व्यक्त केला.

# 'लाडक्या बहिणीं'च्या मदतीला धावले भैय्या अन् ताई; अर्ज भरण्याची प्रक्रिया गतिमान!

## बीड मतदारसंघात डॉ.योगेश, सारिकाताईंचे कार्यकर्ते भरून देतायेत महिलांना अर्ज

**बीड । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना बीड मतदारसंघातील गावागावात प्रभावीपणे राबविली जात आहे. शहरासह मतदारसंघातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, 'कल्पतरू'च्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिरे घेतली जात आहेत. दुसरीकडे योजना राबविताना येणाऱ्या अडचणींबाबत डॉ.योगेश क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची सोमवारी (दि.२२) भेट घेऊन निवेदन दिले.



बीड मतदारसंघात महायुती सरकारची महत्त्वकांक्षी असलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहिणी योजना सर्वत्र राबविली जात आहे. यासाठी बीड मतदारसंघात राष्ट्रवादी ◀◀ पान ३ वर

### जिल्हाधिकाऱ्यांकडून सकारात्मक प्रतिसाद

लाडकी बहिण योजनेसाठी आवश्यक असणारे उत्पन्नाचे प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, रेशन कार्ड आदी कागदपत्रे प्रशासनाकडून वेळेवर मिळत नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. यासह योजनेसंबंधी सर्व्हर डाऊन होत आहे. या अडचणी दूर करण्याची मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्याकडे केली. या प्रश्नी जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून कागदपत्रे वेळेवर उपलब्ध करून देण्याचे निर्देश यंत्रणांना दिले आहेत.

### लाडकी बहिण योजना प्रभावीपणे राबविणार–डॉ.सारिका क्षीरसागर

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना महत्वकांक्षी ठरणार आहे. ही योजना बीड मतदारसंघात प्रभावीपणे राबविणार आहोत. योजनेचे अर्ज भरून देण्यासाठी अनेक कार्यकर्ते कामाला लागले आहेत. महिलांनी या योजनेचा लाभ मोठ्या संख्येने घ्यावा. योजना राबविताना येणाऱ्या तांत्रिक अडचणींवर मात करण्यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू आहे.

–डॉ.सारिकाताई क्षीरसागर, सचिव, कल्पतरू.

# परळी–जिरेवाडी मार्गावरील अतिक्रमणे हटविण्याची मागणी

**परळी । प्रतिनिधी**

परळी जिरेवाडी मार्ग ते बायपास पर्यंत मार्गावरील अतिक्रमणे संबंधित विभागाने लक्ष देऊन हटवावीत अशी मागणी जोर धरत आहे.

श्रावण महिना हा हिंदूचा पवित्र महिना असून या महिन्यांमध्ये प्रभु वैद्यनाथाचे दर्शन घेऊन हजारो भाविक जिरेवाडी येथील प्रसिद्ध देवस्थाना असलेले श्री सोमेश्वर महाराज यांचे दर्शन घेण्यासाठी जातात. या मार्गावर अतिक्रमणाने वेडा घातला असून याचा भाविक भक्तासह वाहनधारकांना त्रास सहन करावा लागत आहे. याच मार्गावर असलेल्या नदीच्या ठिकाणी झाडांनी वेडा घातला असून त्यामुळे



समोरचे वाहन वाहनधारकांना दिसत नाही. त्या जागी अपघाताचे प्रमाण वाढले आहे. त्याच ठिकाणी नेहमी अपघात होत असतात. काही जणांचा हातपाय मोडल्याचे उदाहरणे आहेत. सदरील रस्ता हा नगरपालिका प्रशासनाच्या हद्दीमध्ये येत असल्यामुळे या मार्गावरील अतिक्रमणे तसेच झाडांचा वेडा प्रशासनाने काढून घ्यावा या कामांमध्ये मुख्याधिकारी साहेबांनी लक्ष द्यावे अशी विनंती प्रशासनाकडे केली आहे. अपघाताचे प्रमाण रोखण्यासाठी या मार्गावरील अतिक्रमणे काढून घ्यावित आणि झाडांचा वेढा काढावा अशी मागणी केली जात आहे.

# गुरु शिष्य परंपरा हा भारतीय संस्कृतीचा आत्मा –वर्षा मुंडे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

''सनातन भारतीय संस्कृतीमध्ये अध्ययन - अध्यापन प्रक्रिया यांचे खूप मोलाचे स्थान आहे. त्यात गुरु आणि शिष्य हे दोन महत्त्वाचे घटक असून ही गुरु - शिष्य परंपरा भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे,'' असे प्रतिपादन भा.शि.प्र.संस्थेच्या केंद्रीय कार्यकारिणी सदस्या सौ. वर्षा मुंडे यांनी केले. त्या खोलेश्वर महाविद्यालयात गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित तसेच सांस्कृतिक विभागाचे उद्घाटन या कार्यक्रमांच्या निमित्ताने प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या.



याप्रसंगी व्यासपीठावर खोलेश्वर प्राथमिक विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष श्री. उन्मेष मातेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, उपप्राचार्य प्रा.बिभीषण फड,प्रा.डॉ. सुभाष पटेकर,डॉ. रवींद्र कुंबेफळकर, पर्यवेक्षक प्रा. योगेश कुलकर्णी, प्रा. आनंद पाठक, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. तात्या पुरी व प्रा. शैलेश पुराणिक यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना सौ. वर्षा मुंडे म्हणाल्या की संगीत, नाट्य व नृत्य इत्यादी कलांची जोपासना ही गुरूंच्या मार्गदर्शनातच केली पाहिजे तेव्हाच शिष्य यशस्वी होऊ शकतो. संगीत, नाट्य या कला आनंद देणाऱ्या असतात. या सर्व परंपरा जोपासण्याचे काम सांस्कृतिक मंडळाचे आहे. भारतीय संस्कृती ही उन्नत आणि अखंड प्रवाह होणारी आहे ज्यात गुरु शिष्य परंपरा ही वैशिष्ट्यपूर्ण आहे. गुरुच्या सानिध्यात आत्मज्ञान, व्यावहारीक ज्ञान, अध्यात्मिक ज्ञान प्राप्त करून स्वतःला सिद्ध करणारे शिष्य यांची परंपरा भारत देशाला लाभली आहे असे सांगून त्यांनी गुरुपौर्णिमेच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या तसेच सांस्कृतिक विभागाचे उद्घाटन झाले असे जाहीर केले. याप्रसंगी श्री. उन्मेष मातेकर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की प्राचीन काळी भारतीय संस्कृती ही अत्यंत पुढारलेली होती. प्राचीन काळी अनेक विद्यापीठे आपल्या देशात कार्यरत होती. ही विद्यापीठे व येथील ज्ञान परंपरेवर आघात करण्याचा प्रयत्न अनेक परकीय शक्तींनी केला परंतु केवळ गुरु–शिष्य परंपरेमुळेच आपली हिंदू संस्कृती टिकून राहिली आहे. आपला पहिला गुरु ही आई असते, नंतर पालनकर्ते वडील व त्यानंतर ◀◀ पान ३ वर

# माजलगावात गुरूवारी ओबीसी आरक्षण बचाव संवाद यात्रा; दुचाकी रॅली व मेळाव्याचे आयोजन

**माजलगाव । प्रतिनिधी**

उठ ओबीसी जागा हो..आरक्षण बचाव लढ्याचा धागा हो..हे ब्रिद घेवुन प्रा. लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे यांची ओबीसी भटके विमुक्त आरक्षण बचाव संवाद यात्रा व भव्य मेळाव्याचे आयोजन दि. २५ जुलै गुरूवार रोजी दु. १२.०० वाजता वैष्णवी मंगल कार्यालयात करण्यात आले आहे.



या संवाद यात्रेनिमीत्त मोटार सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले असुन वसंतराव नाईक चौक मार्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, राजे मल्हारराव होळकर चौक, छत्रपती संभाजी महाराज चौक, बायपास रोड येथुन वैष्णवी मंगल कार्यालयात रॅलीचा समारोप होउन याठिकाणी ओबीस समाजबांधवांचा मेळावा होणार असुन प्रा. लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे समाजबांधवांना संबोधित करणार आहेत. दि. २५ जुलै दु. १२.०० वाजता होणा–या या कार्यक्रमास व दुचाकी रॅलीत समाजबांधवांनी सहभागी व्हावे असे आवाहन सकल ओबीसी समाज माजलगाव तालुक्याच्या वतीने करण्यात आले आहे.

# ऑल इंडिया पारणे इन्सानियत फोरमच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील ऑल इंडिया पयामे इन्सानियत फोरम शाखा माजलगाव यांच्या वतीने दि २३ जुलै मंगळवार रोजी येथील जिल्हा परिषद शाळा नं १ येथील मराठी उर्दू शाळेतील विद्यार्थींना शैक्षणिक साहित्य वही व पेनचे वाटप करण्यात आले यावेळी शाखेचे प्रमुख अब्दुल माजेद नदवी,मौलाना निसार तसेच सामाजिक ◀◀ पान ३ वर

# राज्यातील पत्रकारांच्या एकीच्या शक्तीचे दर्शन सरकारला घडेल - वसंत मुंडे

## दिक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रेला २८ जुलैपासून प्रारंभ

**बीड । प्रतिनिधी**

केंद्र आणि राज्य सरकारची एकूण धोरणे लक्षात घेता जिल्हा, तालुका, गाव पातळीवरील छोटी वृत्तपत्रे आणि पत्रकार ही व्यवस्था कमजोर करण्याचीच राहिली आहेत. समाजातील विविध व्यावसायीक, नोकरदार, तरूण, महिला या घटकांना न्याय देताना पत्रकारांच्या मागण्यांकडे मात्र दुर्लक्ष केले जाते. सरकार मतपेढीचा विचार करून हजारो कोटींच्या घोषणा करते. मात्र सरकारच्या योजना लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम करणार्या पत्रकारांचेच प्रश्न पाठपुरावा करूनही सुटत नाहीत. पत्रकारही समाजातील प्रमुख घटक आहेत. याची आठवण करून देण्यासाठी संवाद यात्रा होणार आहे. संवाद ही नैसर्गिक प्रक्रिया असून ती थेट वैयक्तीक आणि संस्थात्मक ◀◀ पान ३ वर



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्यातील वाहतूकीच्या समस्येसाठी तज्ज्ञ प्रतिनिधींची समिती

**पुणे | प्रतिनिधी**

शैक्षणिक, सांस्कृतिक, व्यावसायिक, औद्योगिक संधींचे शहर म्हणून पुणे शहराने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. यापुढील काळात वाहतूक कोंडीमुक्त शहर म्हणून शहराची ओळख निर्माण होण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून विविध उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले.

पुणे शहराच्या वाहतूक कोंडी समस्येचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात सर्वंकष आढावा घेतला. या बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असिमकुमार गुप्ता, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव सदाशिव साळुंखे, पुण्याचे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे शहराचे अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील उपस्थित होते. पुणे शहराचे पोलीस आयुक्त अमितेशकुमार, पीएमआरडीएचे महानगर आयुक्त योगेश म्हसे, पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त बी.




पृथ्वीराज आदी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. यावेळी पुणे शहर वाहतूक पोलिसांनी सादरीकरण केले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, पुणे शहर आणि परिसरातील औद्योगिक विकासामुळे निर्माण झालेल्या रोजगाराच्या संधींमुळे राज्याच्या विविध भागांतून पुणे शहरात नागरिक येत असतात. त्यामुळे पुणे शहराचे झपाट्याने नागरिकरण झाले आहे. ही प्रक्रिया अजूनही सुरू असून मागील काही वर्षात पुणे शहराची दुपटीने वाढ झाली आहे. या वाढत्या लोकसंख्येमुळे पुणे शहरातील पायाभूत सोयीसुविधांवर ताण येऊन स्थानिक नागरिकांना वाहतूक कोंडीची समस्या भेडसावत आहे. पुणेकरांची वाहतूक कोंडीच्या समस्येतून कोणत्याही परिस्थितीत सुटका झाली पाहिजे. त्यासाठी विविध उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करा, असे निर्देश दिले.पुढे बोलताना अजित पवार म्हणाले की, पुणे शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी शक्य त्या सर्व उपाययोजना करण्यात येणार आहेत. सुरुवातीला कमी खर्चाच्या, कमी कालावधीत पूर्ण होणाऱ्या उपाययोजनांवर भर देण्यात येईल. त्यासाठी एकेरी वाहतूक व्यवस्था सुरु करणे, रस्त्याच्या कडेला असलेली अतिक्रमणे काढणे, सिग्नलची वेळ कमी करणे, सिग्नलविरहित वाहतूक व्यवस्थापन, अंतर्गत रस्त्यांचे रुंदीकरण, मिसिंग लिंक्स जोडणे आदी उपाययोजना कराव्यात.

अजित पवार पुढे बोलताना म्हणाले की, पुणे वाहतूक पोलिसांनी शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठीच्या उपाययोजनांचा विस्तृत प्रस्ताव पाठवावा. त्याअनुषंगाने महानगरपालिकेने पुणे ते कात्रज रस्त्यावरील नवले जंक्शन येथील अतिक्रमण हटविण्यात यावे. त्यासाठी पुणे शहर पोलीस आयुक्तांनी पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून द्यावा. नवले ब्रीज, कोरेगाव पार्क, एबीसी चौक आदी ठिकाणची वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी प्राधान्याने उपाययोजना कराव्यात. पुणेकरांची वाहतूक कोंडीतून मुक्तता करण्यासाठी राबवावयाच्या उपक्रमांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल. ही समस्या सोडविण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता व अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करावा. वाहतूक व्यवस्थापनाशी संबंधित पोलीस, महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आदी यंत्रणांनी समन्वयाने काम करत पुणेकरांची या समस्येतून सुटका करावी. त्यासाठी या यंत्रणांच्या वाहतूकविषयक तज्ज्ञ प्रतिनिधींचा समावेश असणारी समन्वय समिती स्थापन करावी, अशा सूचना दिल्या.

## ऑनलाइन टास्कच्या आमिषाने तरुणाची १३ लाखांची फसवणूक



पुणे | प्रतिनिधी

ऑनलाइन टास्कमध्ये गुंतवणुकीवर चांगला परतावा देण्याचे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी एका तरुणाची १३ लाख रुपयांची फसवणूक केली. धनकवडी परिसरात हा प्रकार घडला.

या प्रकरणी तरुणाने (वय ३५, रा. धनकवडी) सहकारनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. चोरट्यांनी या तरुणाला घरबसल्या मोबाईलवर ऑनलाइनद्वारे कामाची संधी असल्याचा संदेश पाठविला. चोरट्यांनी तरुणाला सुरुवातीला एक काम सोपवून त्याचा मोबदला दिला. त्यानंतर त्यांनी पुन्हा तरुणाच्या मोबाईलवर संपर्क साधला. ऑनलाइन टास्कमध्ये गुंतवणुकीवर चांगला परतावा देण्याच्या आमिषाने बँक खात्यात पैसे जमा करण्यास सांगितले. त्यावर तरुणाने चोरट्यांच्या बँक खात्यात वेळोवेळी १३ लाख २५ हजार रुपये जमा केले. परंतु चोरट्यांनी परतावा देण्यास टाळाटाळ केली. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तरुणाने पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुरेंद्र माळाळे करीत आहेत.

## मनोज जरांगे पाटील यांची पुण्यात ११ ऑगस्ट रोजी शांतता रॅली

**पुणे | प्रतिनिधी**

अखंड मराठा समाज महाराष्ट्र राज्य, पुणे जिल्हा व सर्व मराठा सेवक यांच्या वतीने मनोज जरांगे पाटील यांची पुण्यात शांतता रॅली आयोजित केली आहे, अशी माहिती समाजाचे मराठा सेवक यांनी पत्रकार परिषदेत दिली.




ही शांतता रॅली रविवार दि ११ ऑगस्ट रोजी काढण्यात येणार आहे. रॅलीची सुरुवात सारसबाग येथील तळ्यातील गणपती मंदिरापासून सकाळी ११ वाजता होईल. बाजीराव रोड मार्गे आप्पा बळवंत चौकातुन रॅली, छत्रपती शिवाजी महाराज मिलिटरी स्कुल येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाला अभिवादन करण्यासाठी जाईल. तसेच जंगली महाराज रस्त्याने रॅली पुढे जाऊन डेक्कन येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून अलका टॉकीज चौकात मराठा समाजाला संबोधित करतील. रॅलीमध्ये साधारणत २५ लाख मराठा बांधव सहभागी होतील.

संपूर्ण पुणे जिल्ह्यातील मराठा बांधवांची चांदणी चौक येथे बैठक पार पडली. या बैठकीत सर्वानुमते मनोज जरांगे यांनी पुण्यात येऊन मराठा आरक्षणा संदर्भात जनजागृती करावी असा निर्णय झाला. त्यानुसार मराठा सेवकांनी अंतरवाली सराटी येथे जाऊन भेट घेतली आणि त्यांना विनंती केली.

मराठा समाजातील सर्व व्यावसायिक, सामाजिक संस्था, संघटना, राजकीय पक्ष यांनी स्वयंस्फूर्तीने शांतता रॅलीमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे. मात्र कोणताही राजकीय पक्ष त्याचे नाव, चिन्ह, पद बाजूला ठेवून एक मराठा सेवक म्हणून समाजासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व आजी माजी नगरसेवक आमदार, खासदार, पदाधिकारी यांनी देखील सहभागी व्हावे अशी मराठा समाजाची अपेक्षा आहे.

## बेवारस रुग्णांना निर्जनस्थळी सोडणाऱ्या ससूनच्या डॉक्टरांना दणका, दोघांचे निलंबन; वंचितने उघड केला धक्कादायक प्रकार

पुणे | प्रतिनिधी

पुणे शहरातील ससून रुग्णालय गेल्या काही दिवसांपासून चर्चेचा विषय बनलं आहे. ससून रूग्णालयातील अनेक प्रकरण समोर येत असताना आता पुन्हा एकदा ससून हॉस्पिटलमधून धक्कादायक प्रकार समोर आला आहे.ज्या सामाजिक संस्थांकडून बेवारस तसेच रस्त्यावर राहणाऱ्या लोकांना ससून रुग्णालयात उपचारासाठी येत असतात अशा रुग्णांवर उपचार न करता त्यांना ससूनमधील डॉक्टरांकडून बेवारस ठिकाणी सोडण्यात येत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. डॉक्टरांच्या या कृत्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आह. वंचित बहुजन आघाडीचे रितेश गायकवाड व सामाजिक कार्यकर्ते दादासाहेब गायकवाड यांनी उघडकीस आणला आहे.याबाबत आत्ता ससून हॉस्पिटलमधील डॉक्टर आणि त्याच्या सहकाऱ्यांवर पुण्यातील येरवडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

ससून रुग्णालयात निलेश नावाचा




मध्यप्रदेश येथील ३२ वर्षाचा रुग्ण हा १६ जून रोजी ससून रुग्णालयात ॲडमिट करण्यात आलं होते. त्याच्यावर उपचार देखील झाले एवढंच नाही तर त्याच्या पायाची शस्त्रक्रिया देखील झाली आणि कालांतराने तो रुग्ण काही प्रमाणात बरा झाला. पण शस्त्रक्रिया झालेल्या अवघ्या काही दिवसात निवासी डॉक्टरांनी संबंधित रुग्णाला चक्क ऑटो रिक्षामध्ये बसत येरवड्याच्या एका निर्जन स्थळी सोडल्याचे समोर आलं आहे. जेव्हा हा व्हिडीओ समोर आला तेव्हा या प्रकरणात ससून रुग्णालयातील आदी कुमार या डॉक्टराला निलंबित करण्यात आलं असून या प्रकरणी चौकशी समिती देखील नेमण्यात आली आहे. जो कोणी यात दोषी असेल त्याच्यावर कारवाई करण्यात येणार असल्याचं यावेळी ससूनचे अधिष्ठाता डॉ.एकनाथ पवार यांनी सांगितल. गेल्या काही दिवसांपासून ससून रुग्णालयातील भोंगळ कारभार वारंवार उघडकीस येत आहे.ससून रुग्णालयात उपचार घेणारे जे बेवारस रुग्ण आहे त्यांच्यावर उपचार करण्याऐवजी रात्रीच्या वेळी त्या रुग्णांना निर्जनस्थळी सोडून येत आहे. हा संपूर्ण प्रकार वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते रितेश गायकवाड व सामाजिक कार्यकर्ते दादासाहेब गायकवाड यांनी उघडकीस आणला आहे.

### सखोल चौकशी करण्याची मागणी

**सोमवारी पहाटे दीड वाजता हा सगळा प्रकार घडला असून सामाजिक कार्यकर्ते रितेश गायकवाड हे रिक्षा घेऊन ससून रुग्णालयाबाहेर उभा होता. ससून रुग्णालयातील डॉ. आदीनाथ कुमार आणि त्याच्या एका सहकाऱ्याने निलेश नावाच्या बेवारस रुग्णाला सोडून यायचे आहे येणार का अशी चौकशी केली. काही वेळाने डॉक्टरानी सांगितल्यानुसार नवीन बिल्डिंगमधला दोन्ही पाय नसलेला आणि हातात सुई, विविध ठिकाणी जखमी झालेला एक रुग्ण रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी रिक्षात बसवला आणि त्याला अज्ञात स्थळी सोडण्यात आले. या सगळ्या प्रकरणानंतर काँग्रेस आमदार रवींद्र धंगेकर यांनीही आक्रमक पवित्रा घेत थेट दिनच्या केबिनमध्ये शिरकाव केला आणि संबंधित डॉक्टराला निलंबनाची कारवाई करत याची सखोल चौकशी करण्याची मागणी देखील केली आहे.**

## युनिक ओळखपत्रासाठी दिव्यांगांची पायपीट

पुणे, : दिव्यांग प्रमाणपत्रातील फसवणुकीला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारद्वारे 'युनिक डिसबिलिटी आयडेंटिफिकेशन कार्ड' (यूडीआयडी) अर्थात युनिक ओळखपत्र बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र युनिक ओळखपत्र काढण्यासाठी दिव्यांगांना अनेक दिव्यांचा सामना करावा लागत आहे.

दिव्यांग कल्याण विभागाच्या वतीने पुणे जिल्ह्यातील तेरा रुग्णालयामध्ये या प्रमाणपत्रासाठी लागणाऱ्या तपासणी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामध्ये शहरातील ससून, कमला नेहरू, प्रादेशिक मनोरुग्णालय, कमांड रुग्णालय या रुग्णालयांचा समावेश आहे. मात्र संकेतस्थळावर कोणत्या दिव्यांग प्रकारासाठी कोणत्या रुग्णालयाची निवड करावी याची स्पष्टता नसल्याने दिव्यांगांची हेळसांड होत असल्याचे दिव्यांग नागरिकांनी सांगितले.

संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज केल्यानंतर दिव्यांगांना स्वतःच्या तपासणीसाठी नजीकचे रुग्णालय निवडावे लागते. मात्र रुग्णालयामध्ये त्या संदर्भातील तज्ज्ञ उपलब्ध असतीलच असे नाही. त्यामुळे परत संकेतस्थळावरून वेगळ्या रुग्णालयाची निवड करावी लागते. यामध्ये दिव्यांगांना नाहक त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे संकेतस्थळावर कोणत्या रुग्णालयामध्ये कोणते तज्ज्ञ उपलब्ध आहेत यासंदर्भात माहिती उपलब्ध व्हावी, अशी मागणी दिव्यांग नागरिकांनी केली आहे.

## विनापरवाना ड्रोन उडविणाऱ्यांवर कारवाई करणार : किरण अवचर

जुन्नर, : "पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील सर्व ड्रोन धारकांनी 'डीजीसीए'ची परवानगी सर्टिफिकेट त्वरित जमा करावे. कोणत्याही कार्यक्रमांत विनापरवाना ड्रोन उडविल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल,'' असा इशारा प्रभारी अधिकारी किरण अवचर यांच्याकडून ड्रोन धारकांना दिला आहे.



मागील काही दिवसांपासून जुन्नर पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील विविध गावांतून विनापरवाना ड्रोनचा वापर टेहेळणी, चोरी करणे, इत्यादी कामांसाठी केला असल्याच्या अफवा आहेत. मात्र, ड्रोनमुळे अद्यापपर्यंत कोणतीही चोरीची घटना घडली नसून लोकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन केले आहे.विनापरवानगी व बेकायदेशीर उडणाऱ्या ड्रोनचा शोध घेण्यासाठी पोलिस पथके तयार केली असून रात्रीच्यावेळी ड्रोन उडवताना आढळल्यास पोलिस ठाण्याशी संपर्क साधल्यास तेथे पोलिस पथक पाठविण्यात येईल, तसेच विनापरवानगी ड्रोन उडवताना कोणताही संशयित इसम नागरिकांना मिळून आल्यास तत्काळ पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा. या व्यक्तीस कोणत्याही प्रकारे मारहाण करू नये, मॉब लिंचींगचा प्रकार होणार नाही, याची काळजी घ्यावी. पोलिसांकडून योग्य ती कायदेशीर व कडक कारवाई केली जाईल. कोणीही कायदा हातात घेऊ नये असेही कळविण्यात आले आहे.रात्रीच्यावेळी उडणाऱ्या ड्रोनविषयी खोटी माहिती देऊ नये, सोशल मीडियावर ड्रोन संदर्भातील माहिती खात्री न करता इतर ग्रुपला फॉरवर्ड करू नये. रात्रीच्यावेळी ड्रोन उडवताना आढळून आल्यास खालील नंबर वर तत्काळ संपर्क साधावा. जुन्नर पोलिस स्टेशन- ०२१३२ २२२०३३, प्रभारी अधिकारी किरण अवचर - ७५८८९४२०६२, पोलिस उपनिरीक्षक संदीप पर्वते - ८८०५४४०४४४.

## शशिकांत महावरकर यांची पिंपरी चिंचवड पोलीस सह आयुक्तपदी नियुक्ती

पुणे | प्रतिनिधी

विशेष पोलीस महानिरीक्षक शशिकांत महावरकर यांची पिंपरी चिंचवड पोलीस सह आयुक्त पदी नियुक्ती झाली आहे. सध्या ते गुन्हे अन्वेषण विभाग महाराष्ट्र राज्य, पुणे येथे विशेष पोलीस महानिरीक्षक पदी कार्यरत होते.

राज्यातील भारतीय पोलीस सेवेतील (आयपीएस) तीन अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या. याबाबतचे आदेश गृह विभागाचे सहसचिव व्यंकटेश भट यांनी आदेश दिले आहेत. त्यामध्ये विशेष पोलीस महानिरीक्षक (महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई) सुहास



वारके यांची विशेष पोलीस महानिरीक्षक नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य मुंबई येथे बदली झाली. विशेष पोलीस महानिरीक्षक नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य मुंबई येथे कार्यरत असलेल्या अश्र्वती दोरजे यांची सुहास वा यांच्या जागी विशेष पोलीस महानिरीक्षक महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई येथे बदली झाली आहे.लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवडचे तत्कालीन पोलीस सह आयुक्त डॉ. संजय शिंदे यांची गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे येथे विशेष पोलीस महानिरीक्षकपदी बदली झाली होती. त्यानंतर हे पद रिक्त होते. या पदावर वर्णी लागण्यासाठी अनेक नावांची शक्यता वर्तवली जात होती. मंगळवारी (दि. २३) गृह विभागाने केलेल्या बदल्यांमध्ये पिंपरी चिंचवड पोलीस सह आयुक्त पदी विशेष पोलीस महानिरीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे येथे कार्यरत असलेले शशिकांत महावरकर यांची बदली केली आहे.

## लिफ्टच्या बहाण्याने महिलेस लुटणारा कारचालक अटकेत

**दौंड | प्रतिनिधी**

महिलेला कारमध्ये लिफ्ट दिल्यानंतर वाटेत दमदाटी व मारहाण करून तिच्याकडील रोकड आणि सोन्याचे दागिने लुटणार्या कारचालकाच्या दौंड पोलिसांनी मुसक्या आवळल्या. हा लूटमारीचा प्रकार रविवारी (दि. २१) रात्री साडेआठ ते ९ वाजण्याच्या सुमारास दौंडमधील नगर मोरी ते सोनवडी पुलादरम्यान घडला.



बिंदू प्रकाश पानसरे (वय २८, रा. पाटस, ता. दौंड) असे अटक करण्यात आलेल्या कारचालकाचे नाव आहे. ऋतुजा निळकंठ पुकळे (रा. संभाजीनगर) यांनी दौंड पोलिस ठाण्यात याबाबत फिर्याद दाखल केली आहे.ऋतुजा पुकळे या रविवारी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास दौंडमधील नगर मोरी चौकात संभाजीनगरला जाण्यासाठी एसटी बसची वाट पाहत होत्या. या वेळी त्यांच्याजवळ एक पांढर्या रंगाची कार आली आणि त्यातील चालक बिंदु पानसरेने त्यांना 'मी अहमदनगरला चाललो आहे, तुम्हाला सोडतो,' असे सांगून त्यांना कारमध्ये बसवले. त्यानंतर कार सोनवडी येथील पुलाजवळ आली असता पानसरेने कार थांबवली. पुकळे यांना दमदाटी व मारहाण करून त्यांच्याकडे असलेली बॅग व त्यातील रोकड, सोन्याचे दागिने घेत पानसरेने तेथून पळ काढला. पुकळे यांनी दौंड पोलिस ठाणे गाठत याबाबत फिर्याद दाखल केली. या प्रकाराची पोलिस निरीक्षक संतोष डोके यांनी तातडीने दखल घेत परिसर पिंजून काढला. परंतु आरोपी सापडला नाही. शेवटी महामार्गावरील सीसीटीव्ही पोलिसांनी तपासले. त्यामध्ये पानसरेची कार दिसून आली, त्यानुसार त्याला पकडले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून रोकड, दागिन्यांसह कार असा एकूण ५ लाख ५० हजार रुपयांचा ऐवज पोलिसांनी जप्त केला.

## 'दुष्काळी भागातील तलावात अधिकचे पाणी सोडा'

**सुपे | प्रतिनिधी**

खडकवासला धरणातून कालव्याद्वारे अधिकचे वाहून जाणारे पाणी जनाई व शिरसाई उपसा जल सिंचन योजनेद्वारे दुष्काळी भागातील तलावात सोडण्याची शेतकरी संघर्ष कृती समितीची मागणी आहे. याबाबत पुणे पाटबंधारे मंडळाच्या अधीक्षक अभियंत्यांसह संबंधित कार्यालयाकडे शेतकरी संघर्ष कृती समितीने लेखी निवेदनाद्वारे मागणी केल्याची माहिती पोपटराव खैरे यांनी दिली. जनाई-शिरसाई योजनेद्वारे आता पाणी मिळाले तर खरिपातील पिकांना जीवदान मिळणार आहे. त्यामुळे या उपसा सिंचन योजना सरकारने तातडीने सुरू करण्याची त्यांची मागणी आहे. बारामती, दौंड व पुरंदर तालुक्यांच्या योजनेच्या लाभधारक गावांच्या परिसरात झालेल्या पावसावर शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या आहेत. परंतु, पुरेसा पाऊस नसल्याने अनेक तलावात पाणीसाठा झाला नाही. ओव्हरफ्लोच्या पाण्याने योजनेद्वारे दुष्काळी भागातील तलाव भरण्याची मागणी करण्यात आली आहे.

## तिन्ही विधानसभा मतदारसंघावर काँग्रेसचा हक्क - कैलास कदम

पुणे: - आगामी विधानसभा निवडणुकीसाठी पिंपरी, चिंचवड, भोसरी हे तिन्ही मतदारसंघ काँग्रेसला मिळणे हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो आम्ही मिळवणारच आहोत, असे काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास कदम यांनी सांगितले.

पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने लोकमान्य टिळक यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांच्या सूचनेनुसारशहर जिल्हा काँग्रेस कमिटीची कार्यकारिणीची आढावा बैठक खराळवाडी येथील पक्ष कार्यालयात पार पडली. पिंपरी ,चिंचवड, भोसरी ब्लॉक कमिटीच्या प्रभाग प्रमाणे बूथ प्रतिनिधींचा आढावा घेतला.

यावेळी बोलताना कैलास कदम म्हणाले, सर्व मतदारसंघात बूथस्तरावर पक्षाचे पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी बांधणी करावी, प्रदेश पातळीच्या सूचनेवरून योग्य ते बूथ प्रतिनिधी नेमणूक करून त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे, निवडणुकीचा कालावधी कमी राहिल्याने दिवस रात्र पक्षाच्या कार्यकर्त्यांनी झोकून देऊन काम करावे. तसेच नवीन मतदार नोंदणी देखील जास्तीत जास्त मतदार नोंद करण्यात यावी. विधानसभा व त्यानंतर होणारी महानगरपालिका यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी सज्ज व्हावे, पिंपरी, चिंचवड, भोसरी हे तिन्ही मतदारसंघ ही काँग्रेसला मिळणे हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो आम्ही मिळवणारच असा संकल्प घेऊन मैदानात उतरून काम करूया, पक्षश्रेष्ठींना देखील अशा प्रकारची मागणी शहर काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे, पक्षाचा सर्वसामान्य कार्यकर्ता हाच काँग्रेसचा उमेदवार म्हणून येणाऱ्या काळात दिसेल. याप्रसंगी माजी महिला काँगेस प्रदेशाध्यक्षा श्यामला सोनवणे, पर्यावरण विभाग माजी प्रदेशाध्यक्ष अशोक मोरे, ज्येष्ठ नेते भाऊसाहेब मुगुटमल, संदेश नवले, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पर्यावरण विभाग सरचिटणीस अमर नाणेकर, प्रदेश काँग्रेस सामाजिक न्याय विभाग उपाध्यक्ष वाहब शेख, प्रदेश काँग्रेस सामाजिक न्याय विभाग उपाध्यक्ष चंद्रकांत लोंढे, वरिष्ठ उपाध्यक्ष मयूर जयस्वाल, ॲड. अनिरुध्द कांबळे, चिंचवड ब्लॉक अध्यक्ष माऊली मलशेट्टी, पिंपरी ब्लॉक अध्यक्ष विश्वनाथ जगताप, भोसरी ब्लॉक अध्यक्ष विठ्ठल शिंदे, सेवादल अध्यक्ष प्रा. किरण खाजेकर, प्रोफेशनल काँग्रेस अध्यक्ष दाहर मुजावर, झोपडपट्टी सेल अध्यक्ष प्रा, बी, बी. कांबळे, सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष ॲड. अशोक धायगुडे, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस सचिव व राष्ट्रीय प्रवक्ते गौरव चौधरी, व्यापारी सेलचे अमरजीतसिंग पाथीवाल, शहर उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, सोमनाथ शेळके, मेहबूब शेख, अर्चना राऊत, स्मिता पवार-मुलाणी, अबूबकर लांडगे, शहर सरचिटणीस जार्ज मॅथ्यू, मून्साफअली खान, निखिल भोईर, आण्णासाहेब कसबे, सतीश भोसले, वसंत वावरे, जुबेर खान, रवींद्र कांबळे, शहर सचिव ॲड. मोहन अडसूळ, आकाश शिंदे, योगेश बहिरट, युनूस बागवान पिंपरी ब्लॉक उपाध्यक्षा ज्योती गायकवाड, शहाबुद्दीन शेख, मकरध्वज यादव, विशाल कसबे, आप्पासाहेब सोनावणे, प्रतिक जगताप, पांडुरंग जगताप, बाजीराव आल्हाट, श्रेयश लाटकर, अरुण वानखेडे, आर. जी. ओव्हाळ, फिरोज तांबोळी, संगमेश्वर गंगापुरे, अंगद काशिद आदींसह या बैठकीस शहर काँग्रेस मधील आजी-माजी सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.